जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# सुनेत्राताईंच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीची घाई : अनाकलनीय 'राजकीय षड्यंत्राचा संशय'



महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदाची सुनेत्रा पवार यांनी ज्या घाईगडबडीने शपथ घेतली ती राजकीय वर्तुळात अनाकलनीय ठरते. अजित दादांच्या दुर्दैवी मृत्यूनंतरचा सुतककाळ संपेपर्यंत सुनेत्राताईंना थांबता येऊ शकले असते पण तसे झाले नाही. ही बाब पवार कुटुंबीयांच्याच काय तमाम महाराष्ट्राच्या पचनी पडणारी हमखासच नाही. पंतप्रधान अथवा मुख्यमंत्री ही पदे घटनात्मक असतात, ती रिक्त होतात, तातडीने निवड करावी लागते, ती स्थिती उपमुख्यमंत्री पदाची नाही, मग ही घाईगडबड करण्याचे नेमके प्रयोजन काय? याची उकल सहजासहजी होत नसल्याने राजकीय षड्यंत्राचा संशय बळावतो. त्यातच सुनेत्राताईंनीच शपथविधीनंतर दादांचा दशक्रिया झाल्यानंतर कार्यभार स्वीकारणार असल्याचे स्पष्टीकरण दिले तसे असेल तर मग शपथविधीची घाई का व कशासाठी? याचे समर्पक उत्तर मिळत नाही. या घडामोडीवरून (अजित पवार) जे राजकारण रणनीती किती दुसऱ्यांवर अवलंबून आहे, हे ठळकपणे अधोरेखित होते. त्यात केंद्रीय मंत्री गोयल यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला मुलाखत देऊन राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रफुल्ल पटेल यांची निवड झाल्याचे जाहीर केल्यावर राष्ट्रवादीने या वृत्ताचे खंडन केले, पण या निमित्ताने भाजपचा नेता राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या नावाची परस्पर घोषणा कशी करू शकतो? भारताच्या इतिहासात अशा पद्धतीचे कोणी धाडस केले नव्हते, तो प्रताप भाजपकडून झाला. ज्याअर्थी धूर निघाला, त्याअर्थी जाळ झालेला असणार, यावरून हे राजकीय 'स्क्रिप्ट' कोणाचे? याबाबतचा संशय गडद होतो. सोशल मीडियावर अमित शहांची शिंदे सेना आणि फडणवीस यांची राष्ट्रवादी! अशी जी कमेंट व्हायरल होते, ती राजकीय निरीक्षकांना दुर्लक्षून चालता येणार नाही. त्यातूनच या षड्यंत्राचा केंद्रबिंदू कोठे दडला असावा, याचा किमान अंदाज बांधता येऊ शकतो.

### तुलना अप्रस्तुत पण...

इंदिरा गांधी यांच्या निधनानंतर राजीव गांधींना पंतप्रधानपदाची शपथ देण्यात आली, कारण राज्यघटनेनुसार हे पद रिक्त ठेवता येत नाही. मुख्यमंत्री पदाबाबत ही तसेच आहे म्हणून अण्णा डी एम के चे रामचंद्रन यांच्या निधनानंतर तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी त्यांच्या पत्नी जानकी यांचा शपथविधी झाला होता तसेच आंध्रप्रदेशमध्ये एन.टी. रामाराव यांची पत्नी मुख्यमंत्री झाल्या. हा घटनात्मक पेच असतो पण तसे उपमुख्यमंत्रीपदाबाबत नाही. हे पद घटनात्मक नसून मंत्रीपद हा त्याचा भाग असतो. मंत्रीपदाची घटना शपथविधीसाठी घाई करण्याचे कायदेशीर बंधन नाही. या घडामोडींची तुलनाच करायची असेल तर ती राजकीय होऊ शकते. जानकीच्या नेतृत्वाखालील डीएमके पक्षाची वाताहत झाली, तिच स्थिती आंध्र प्रदेशात एनटी रामराव यांच्या पत्नीच्या तेलगू देशमची झाली असता त्याच मार्गावर राष्ट्रवादी (अप) ची वाटचाल चालू तर नाही ना? अशी शंका घेण्यास पडद्याआड अनेक घडामोडी घडत असाव्यात. या शपथविधीची कुटुंबप्रमुख आणि राज्याचे दिग्गज नेते शरद पवार यांनासुद्धा कल्पना दिली नव्हती. त्यांचा राजकीय पक्ष वेगळा असला तरी ते कुटुंबाचे प्रमुख आहेत. त्यांना किमान विश्वासात घ्यायला हवे होते, परंतु तसे करण्याचे ते जाणीवपूर्वक टाळलेले जाणवते. तेवढेच काय पार्थ पवार हेसुद्धा शपथविधीला कसे उपस्थित राहणार नाहीत, याची पुरेपूर व्यवस्था केल्याचे दिसते. यावरून राष्ट्रवादी (अप) चे राजकारण कशी कलाटणी घेऊ शकते, याचा किमान अंदाज बांधता येऊ शकतो.

### कुटनीतीचा कळस

अजितदादा यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्यावर महाराष्ट्रावर मोठा दुःख आघात झाला. त्या शोकाकुल वातावरणात त्यांच्या पत्नी सुनेत्राताई पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांनी इतक्या घाईत हे पद का स्वीकारले, हा तसा तर्क वितर्काचा विषय ठरतो. त्यांचा रहस्यभेद एक ना एक दिवस होईल, परंतु सध्याच्या स्थितीत बारामतीत पवार कुटुंबाकडे सांत्वनासाठी की सुनेत्राताई उपमुख्यमंत्री झाल्याने अभिनंदनकरिता पुष्पगुच्छ घेऊन जायचे, ही द्विधा अवस्था झाली. त्याला राज्यातील कुटनितीचे राजकारण जबाबदार आहे. यामध्ये दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा मुद्दा आहे की अन्य राजकीय पदर आहेत, याचा उलगडा यथावकाश होईलच, पण राष्ट्रवादी (अप) पक्षांतर्गत चौकटीच्या ज्या कारवाया पुढे येत आहे त्यातून राष्ट्रवादी यावेळी अचानक फुट पडली आणि आता विलिनीकरणाची गरज का भासते? याचा अंदाज पवार साहेब आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विधानावरून जसा येतो, तसा तो सुनेत्राताई यांच्या शपथविधीवरूनसुद्धा सुद्धा बांधता येतो पण या निमित्ताने राज्यातील राजकारणाच्या कुटनीतीने कळस गाठला आहे. – **रामदास ढमाले**

# अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना दिल्याच्या संशयावरून एकास लोखंडी गजाने मारहाण


नगर – पोलिसांना अवैध धंद्यांची माहिती दिल्याच्या संशयावरून एकाला तिघांनी लोखंडी गजाने बेदम मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावात विविध कार्यकारी सोसायटीसमोर १ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ च्या सुमारास घडली. अंबादास महादेव शेळके (वय ४४, रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

शेळके यांनी दिलेल्या फिर्यादी वरून नगर तालुका पोलिसांनी फैय्याज गुलाब सय्यद आणि त्याच्या दोन साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी अंबादास शेळके हे गावातील विविध कार्यकारी सोसायटीसमोर आपल्या भावाची वाट पाहत उभे होते. यावेळी आरोपी फैय्याज सय्यद तिथे आला आणि तू पोलिसांना आमच्या खबऱ्या देतो का? कालच माझ्या बिंगोच्या दुकानावर पोलिसांनी रेड टाकली, असे म्हणून शिवीगाळ करू लागला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने फिर्यादीला जबरदस्तीने दुकानात नेले. तिथे फैय्याजने फिर्यादीच्या तोंडावर बुक्क्यांनी प्रहार केला, तर त्याच्या इतर दोन अनोळखी साथीदारांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

यावेळी आरोपीने लोखंडी गजाचा वापर करून शेळके यांच्या पाठीवर वार केले. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी फिर्यादीचा मोबाईल जमिनीवर फेकून त्यावर पाय देऊन काच फोडून नुकसान केले. पुन्हा पोलिसांना माहिती दिली तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेनंतर अंबादास शेळके यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली.

पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## प्रकाशलाल भळगट (रंगवाला) यांचे निधन



नगर – सारसनगर येथील प्रकाशलाल (मोहनलाल) कचरदास भळगट (रंगवाला) (वय ८२) यांचे २ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे पत्नी, हिरेन व जितेंद्र भळगट ही दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, पंतू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. हिंमतलाल कचरदास भळगट (रंगवाला) चे ते मालक होत.

## प्रसाद पारखे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील पारखे ट्रान्सपोर्टचे संचालक प्रसाद हरिभाऊ पारखे ( वय ७५) यांचे ३१ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ बहिणी असा परिवार आहे. ॲड. हर्षल बोऱ्हाडे, हितेश बोऱ्हाडे यांचे ते मामा तर माया पारखे यांचे पती तर कृपा पारखे, जयश्री बोऱ्हाडे यांचे भाऊ होत.

## कलावती पानमळकर यांचे दु:खद निधन



नगर – येथील ज्येष्ठ नागरिक कलावती विश्वनाथ पानमळकर (वय ७१) यांचे २९ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागरदेवळे स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

पानमळकर या फुल व्यावसायिक गणेश व शरद पानमळकर यांच्या मातोश्री होत. त्यांच्या मागे पती, दोन मुले, एक मुलगी, जावई, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

## विजयकुमार मुनोत यांचे दु:खद निधन



नगर – भेंडा फॅक्टरी येथील रहिवासी विजयकुमार चांदमल मुनोत (वय ७८) यांचे १ फेब्रुवारी रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भेंडा फॅक्टरी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संदेश, आदेश मुनोत, शिल्पा यांचे ते वडील होत.

## पुष्पाबाई बोरा यांचे अल्प आजाराने निधन



पुणे – पुणे येथील रहिवासी श्रीमती पुष्पाबाई किसनलाल बोरा (वय ८०) यांचे १ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथील वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुना, नातु, नातसून असा परिवार आहे. राजेश किसनलाल बोरा यांच्या त्या मातोश्री होत.

## दिलीप पारख यांचे हृदयविकाराने निधन



नाशिक – येथील शिवाजी चौकातील शॉपींग सेंटर जवळील जुना सिडकोतील रहिवासी दिलीप चुनीलाल पारख (वय ५९) यांचे १ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचे वसंतराव पवार मेडीकल कॉलेज येथे देहदान करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, पुतणे असा परिवार आहे. स्व. कांतीलाल, स्व.शांतीलाल, अशोकचंद पारख यांचे ते लहान बंधू तर शैलेश, योगेश, धनराज, विनोद पारख यांचे चुलते होत.

# महापौरपदासाठी ज्योती गाडे तर उपमहापौरपदासाठी धनंजय जाधव

*(पान १ वरुन)*

नगरसेवकांचे मोठे संख्याबळ असल्याने युतीचेच महापौर, उपमहापौर होणार हे निश्चित मानले जात आहे. याबाबत निर्णय घेण्यासाठी २ फेब्रुवारी रोजी सकाळी नगरमध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यात दोघांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.



महापौर पदी ज्योती गाडे, उपमहापौरपदी धनंजय जाधव यांची नावे निश्चित केल्यानंतर त्यांच्या समवेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आ. संग्राम जगताप, डॉ.सुजय विखे, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, संपत बारस्कर, गटनेते प्रकाश भागानगरे, शारदा ढवण, गणेश भोसले आदी. (छाया – लहू दळवी)

या बैठकीत केवळ नावांचीच चर्चा झाली नाही, तर सत्तेच्या कालावधीबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. पालकमंत्री विखे पाटील यांच्या सूचनेनुसार, नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौर यांचा कार्यकाळ सव्वा वर्षाचा असेल, असे ठरवण्यात आले आहे. यामुळे युतीमधील इतर इच्छुकांनाही भविष्यात संधी मिळण्याची शक्यता आहे.

राज्यात महायुतीमध्ये एकत्र असले तरी, अहिल्यानगर महानगरपालिकेत मात्र राजकीय समीकरणे वेगळी पाहायला मिळत आहेत. १० नगरसेवक असलेल्या शिवसेनेला (शिंदे गट) या सत्तासमीकरणातून बाहेर ठेवण्यात आले असून, त्यांना आता विरोधी बाकावर बसावे लागणार आहे.

पालकमंत्री विखे यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार दुपारी महापौर पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे व उपमहापौर पदासाठी भाजपाचे धनंजय जाधव यांनी महापालिकेत नगरसचिव मेहेर लहारे यांच्याकडे आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह बाबासाहेब वाकळे, गणेश भोसले, अनिल बोरुडे, अविनाश घुले, निखिल वारे, विपुल शेटीया, पुष्कर कुलकर्णी, तसेच पुष्पाताई बोरुडे, संध्याताई पवार, गीतांजली काळे, शारदाताई ढवण, सतीश शिंदे, जय भोसले, करण कराळे यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

### स्व. शिवाजीराव कर्डिलेंचा जनसेवेचा वारसा पुढे नेणार : ज्योती गाडे यांची प्रतिक्रिया

यावेळी महापौर पदाच्या उमेदवार ज्योतीताई गाडे म्हणाल्या, अहिल्यानगरचे नाव बदलल्यानंतर शहराच्या पहिल्या महापौरपदाचा मान मला मिळत आहे, ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. अहिल्यादेवी होळकरांचा आदर्श व वारसा अखंड ठेवण्यासाठी मी काम करीन. माझे वडील स्व. शिवाजीराव कर्डिले आज हयात असते तर त्यांना मोठा आनंद झाला असता. त्यांचा वारसा आणि विचार पुढे नेण्यासाठी मी कटिबद्ध आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास समर्थपणे पेलण्याचा मी प्रयत्न करीन, असे त्या म्हणाल्या.

### शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहीन : धनंजय जाधव

उपमहापौर पदाचे उमेदवार धनंजय जाधव म्हणाले की, केंद्र, राज्य आणि शहर या तिन्ही पातळ्यांवर राष्ट्रवादी–भाजप युतीचे सत्ताधारी समीकरण असून, नगरकरांना उत्तम सेवा देणे हीच आपली प्राथमिकता आहे. मूलभूत सुविधांपासून विकासाच्या योजनांपर्यंत नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन कार्य करणार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहीन. त्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरवेन, असे त्यांनी सांगितले.

## कार फोडून मोबाईल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पकडले

नगर – शहरातील स्वस्तिक चौक परिसरातील गणेशवाडी येथे उभ्या केलेल्या चारचाकी गाडीची काच फोडून मोबाईल आणि पाकीट चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला कोतवाली पोलिसांनी पकडले आहे. रेहान रिजवान शेख (वय २३, रा. सर्जेपुरा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत अमित मधुसुदन वाळिंबे (रा. गणेशवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. वाळिंबे यांची ह्युंदाई व्हेरना कार बिल्डींगच्या खाली उभी असताना, आरोपीने गाडीचा दरवाजा उघडून डॅशबोर्डमधील सॅमसंग गॅलेक्सी ए–२०–एस मोबाईल आणि पॅनकार्डसह लेदरचे पाकीट चोरले होते. ही चोरीची घटना १ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली. दरम्यान, विनायक नगर परिसरात एका संशयीत इसमाला वॉचमन सुभाष जगताप आणि नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले होते.

पोलिसांनी संशयीताची झडती घेतली असता त्याच्याकडे तीन मोबाईल आणि एक विना क्रमांकाची दुचाकी मिळून आली. त्यातील एका मोबाईलमधील संपर्क क्रमांकावरून पोलिसांनी अमित वाळिंबे यांच्याशी संपर्क साधला, तेव्हा आपली गाडी फोडून चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. पोलिसांनी आरोपी रेहान शेख याला ताब्यात घेऊन १०,५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

# नगर अर्बन मल्टीस्टेट को.ऑप. बँक घोटाळ्याप्रकरणी तत्कालिन पाच संचालकांना नियमित जामीन मंजूर

**शैलेश मुनोत, दिनेश कटारिया, राजेंद्र अग्रवाल, नवनीत सुरपुरिया, कमलेश गांधी यांचा समावेश**



नगर – नगर अर्बन मल्टीस्टेट को.ऑप. बँकेतील घोटाळ्याप्रकरणी नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी बँकेच्या ५ तत्कालिन संचालकांना सर्वोच्च न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. यात शैलेश मुनोत, दिनेश कटारिया, राजेंद्र अग्रवाल, नवनीत सुरपुरिया, कमलेश गांधी यांचा समावेश आहे. याकामी ॲड. श्रेयस उदय ललित, ॲड. हिमांशु वत्स, ॲड. सुधांशु चौधरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाजू मांडली व युक्तीवाद केला. सदर युक्तीवाद ग्राह्य धरून सर्वोच्च न्यालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी नियमित जामीन मंजूर केला.

नगर अर्बन बँकेतील कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी पोलिसांत बँकेच्या तत्कालिन संचालकांसह काही अधिकारी, कर्जदारांवर गुन्हे दाखल झालेले आहे. आर्थिक गुन्हे शाखेमार्फत या गुन्ह्याचा तपास सुरू आहे. या प्रकरणात काही आरोपी न्यायालयीन कोठडीत असून काही आरोपींना अटकपूर्व जामीन मिळालेला आहे. आरोपींपैकी शैलेश मुनोत, दिनेश कटारिया, राजेंद्र अग्रवाल, नवनीत सुरपुरिया, कमलेश गांधी यांचा समावेश यांनी नियमित जामीनासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर सुनावणी झाली. यात आरोपींच्या वकिलांनी युक्तीवाद करीत नियमित जामीनाची मागणी केली. हा युक्तीवाद ग्राह्य धरत सर्वोच्च न्यायालयाने सर्व ५ जणांना नियमित जामीन मंजूर केला.



अमृता फडणवीस यांच्याबाबत अश्लील व अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या अंजली भारती यांच्यावर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन भाजपच्या महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्गे यांना दिले.

# अमृता फडणवीस यांचा अपमान करणाऱ्या अंजली भारतीवर कायदेशीर कारवाई करा

### शहर भाजपा महिला आघाडीची मागणी

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याबाबत सार्वजनिक कार्यक्रमात अश्लील व अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या अंजली भारती या महिलेवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टीच्या महिला आघाडीच्या प्रदेश सचिव गीता गिल्डा यांच्या नेतृत्वाखालीलल महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्गे यांना दिले.

यावेळी महिला आघाडीच्या शहर जिल्हध्यक्षा प्रिया जानवे, कालिंदी केसकर, छाया रजपूत, संध्या पावसे, गया माने, पल्लवी जाधव, सुरेखा जंगम, अर्चना चौधरी, विद्या बडवे, रजनी भंडारी, स्वाती पवळे, मीना सुरडकर आदी उपस्थित होत्या.

यावेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंजली भारती या गायिकेने एका सार्वजनिक कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या बद्दल अत्यंत घाणेरडी व महिलांच्या सन्मानाला ठेच पोचवणारे वक्तव्य केली आहेत. त्यांची ही अशी बेताल केवळ एका व्यक्तीवर विरोधात नसून ती संपूर्ण महिलांच्या प्रतिष्ठेवर आघात करणारी असून महिलांचा मोठा अपमान आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची त्वरित दखल घेऊन अंजली भारती या महिला विरोधात तातडीने योग्य ती कायदेशीर कारवाई करून कडक कलमे लावून त्यांना शिक्षा करावी, जेणेकरून अशा प्रकारची वक्तव्य करण्याचे कोणाचे धाडस होणार नाही.

# जि. प. कर्मचारी सोसायटी चेअरमनपदी संजय कडूस

### व्हाईस चेअरमनपदी अर्जुन मंडलिक यांची बिनविरोध निवड




नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीच्या चेअरमनपदी संजय सुदाम कडूस व व्हाईस चेअरमनपदी अर्जुन दिगंबर मंडलिक यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

संस्थेच्या नूतन पदाधिकारी निवडीसाठी संचालक मंडळची सभा शनिवारी (दि.३१ जानेवारी) संस्थेच्या कार्यालयात जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अध्यासी अधिकारी किरण आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत चेअरमन पदासाठी संजय कडूस यांच्या नावाची सूचना संचालक प्रशांत मोरे यांनी मांडली. सदर सूचनेस कैलास डावरे यांनी अनुमोदन दिले. व्हा. चेअरमन पदासाठी अर्जुन मंडलिक यांच्या नावाची सूचना भाऊसाहेब चांदणे यांनी मांडली. सदर सूचनेस दिलीप डांगे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याचे अध्यासी अधिकाऱ्यांनी जाहीर केले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

संजय कडूस म्हणाले की जय श्री गणेश पॅनलने निवडणुकीच्या वेळी सभासदाना दिलेल्या आश्वासनाची १०० टक्के पूर्तता करण्याचे काम हे संचालक मंडळ करत आहे. संस्थेचे आर्थिक हित व सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून सहकारी संचालक व सभासदांच्या सहकार्याने विविध योजना राबविण्यात येतील. संस्थेचा लौकिक या पुढील काळात अधिक वाढविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न केले जातील असेही ते म्हणाले. व्हा. चेअरमन अर्जुन मंडलिक यांनी सर्व सहकारी संचालकांचे आभार मानून सभासदांच्या हिताचे निर्णय घेवू असे सांगितले.

सदर प्रसंगी संस्थेच्या मावळत्या चेअरमन सुरेखा महारनूर, मावळते व्हा.चेअरमन श्रीकांत देशमाने, संचालक विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, राजू दिघे, चंद्रकांत संसारे, ऋषिकेश बनकर, स्वप्नील शिंदे, ज्योती पवार, कल्याण मुटकुळे, सुधीर खेडकर, काशिनाथ नरोडे, योगेंद्र पालवे, मनिषा साळवे, अभिजित पवार, चेतन चव्हाण, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक प्रशांत लोखंडे, संस्थेचे सभासद सुजाता भांडवलकर व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### ऑक्सिजनची पातळी कमी झाल्यास

शरीरात ऑक्सिजनची पातळी कमी झाल्यास भविष्यात गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. शरीरात ऑक्सिजनची पातळी कमी होणे हा एक मूक धोका असू शकतो जो लोक सहसा हलक्यात घेतात. थकवा, चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा हृदय गती वाढणे यासारखी लक्षणे याची लक्षणे असू शकतात. जर त्यावर लक्ष दिले नाही तर परिस्थिती गंभीर होऊ शकते. अशा परिस्थितीत, ऑक्सिजनची पातळी वाढवण्यासाठी काही सोपे उपाय केले जाऊ शकतात. गूळ, तुळस, लवंग, आले आणि काळी मिरी यांचा काढा प्यायल्याने तुमची ऑक्सिजनची पातळी सुधारू शकते. दररोज थोड्या प्रमाणात प्यायल्याने तुमची ऑक्सिजनची पातळी सुधारू शकते. उन्हाळ्यात या काढ्याचे जास्त सेवन टाळा. दिवसाची सुरुवात सफरचंदाने करणे ही चांगली कल्पना मानली जाते. दररोज ते खाल्ल्याने शरीरातील ऑक्सिजनची पातळी सुधारते. सफरचंदात असलेले व्हिटॅमिन सी आणि लोह रक्तातील ऑक्सिजनची पातळी वाढवते. तुमच्या आहारात अंकुरलेले धान्य नक्कीच समाविष्ट केले पाहिजे. त्यात फायबरचे प्रमाण जास्त असते, जे निरोगी ऑक्सिजन पातळी राखण्यास मदत करते. दररोज एक वाटी अंकुरलेले धान्य खाणे अत्यंत फायदेशीर आहे. बरेच रुग्ण श्वसनाच्या समस्यांवर उपचार करण्यासाठी त्यांचा वापर करतात.

## पाककला

### गव्हाची खीर

**साहित्य :** अर्धी वाटी खपली गहू (भिजवून भरडलेले) किंवा गव्हाचा रवा, १ लिटर दूध, गूळ, तूप, आणि सुका मेवा.

**कृती :** गहू कुकरमध्ये मऊ शिजवून घ्या. एका पातेल्यात दूध आटवून त्यात शिजलेला गहू मिसळा. मिश्रण दाट झाले की त्यात गूळ आणि वेलची पूड घाला. तसेच गूळ घालताना गॅस बंद ठेवावा म्हणजे दूध फाटत नाही.

## वास्तू

### बाथरुमचा दरवाजा

बाथरूमचा उघडा दरवाजा उर्जेचा असंतुलन निर्माण करतो, ज्यामुळे तुमची झोप देखील बिघडू शकते आणि ताण वाढू शकतो. जर तुम्ही रात्री बाथरूमचा दरवाजा उघडा ठेवला तर तुमच्या आयुष्यात मानसिक अशांतता राहते. रात्रीचा वेळ हा विश्रांती आणि ऊर्जा पुनर्भरणासाठी असतो. जर या काळात घरात कोणत्याही प्रकारची नकारात्मक ऊर्जा पसरली तर झोपेची गुणवत्ता खराब होऊ शकते आणि दुसऱ्या दिवशी थकवा जाणवू शकतो. वास्तुदोष रोखायचा असेल तर सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय म्हणजे दिवसा आणि रात्री दोन्ही वेळी बाथरूमचा दरवाजा बंद ठेवणे, जेणेकरून बाथरूममधून कोणत्याही प्रकारची नकारात्मक ऊर्जा बाहेर पडू नये.

## सौंदर्य

मुलतानी माती + गुलाबपाणी + हळद (ऑइली त्वचेसाठी) ऑइली/संमिश्र त्वचेसाठी उत्तम, एक्स्ट्रा ऑइल शोषून घेते आणि ग्लो आणते. साहित्य : १-२ टेबलस्पून मुलतानी माती, गुलाबपाणी (पेस्ट बनवण्यासाठी), चिमटूभर हळद, कसे बनवायचे: मिसळून पेस्ट बनवा, १०-१५ मिनिटे लावा (कोरडे होऊ देऊ नका जास्त). थंड पाण्याने धुवा. फायदे: पोर्स क्लीन होतात, त्वचा मैट आणि ग्लोइंग दिसते.

## सल्ला

प्रेशर कुकर मध्ये जेव्हा आपण डाळ शिजवायला ठेवू अशावेळी कुकरमध्ये एक छोटीशी स्टीलची वाटी अवश्य ठेवा. यामुळे डाळ बाहेर येणार नाही आणि कुकरच्या शिट्टी द्वारे फक्त वाफच बाहेर निघेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, मघा २२।११, सूर्योदय ०६ वा. ४४ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**वृषभ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**मिथुन :** ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**कर्क :** निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण-घेवाण टाळा.

**सिंह :** आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कन्या :** अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल.

**तूळ :** बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. त्यांना ठरावीक वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न करा.

**वृश्चिक :** सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य हवे असेल.

**धनु :** हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. कोणाला संताप येईल कोणी दुखावले जाईल असे बोलू नका.


**मकर :** आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्या.

**कुंभ :** आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल.

**मीन :** आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल. आपल्याविषयी गैरसमज निर्माण होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३५८ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७३५७ चे उत्तर



**आडवे शब्द :-** २) लाकूड कापावयाचे हत्यार किंवा अवजार ६) मुस्लिम वर्षाचा सातवा महिना ७) उशिराने पिकणारे धान्य ८) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ १०) हिंदू वर्षाचा अकरावा महिना ११) पायाची खोट; जसी १३) पालनपोषण करणारे; एक पालेभाजी १५) ओढा; प्रवृत्ती; झोक; वळण १७) एक कडधान्य १८) बाजू घेणारा; पक्ष घेणारा २०) चाकर; सेवक २१) कपाट

**उभे शब्द :-** १) शत्रूला वेड लागावे किंवा त्याला मरण यावे म्हणून केले जाणारे मंत्रप्रयोग २) समाधी; थडगे ४) म्हैस; शिवाय ४) पिवळी फुले येणारी एक वनस्पती; टाकळा ५) हरभऱ्याच्या डाळीचे पीठ ९) झाडाच्या सालीचे वस्त्र १२) भूल पाडणारे भूत १३) समुद्र; मर्यादा; अंत १४) कुंतीला विवाहाअगोदर झालेला मुलगा १६) मोठ्याने मारलेली हाक; आरोळी १८) कित्येक; अनेक १९) पाणी; नीर; जीवन

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : नेहमीच माझच खरं म्हणून चालत नाही कधी कधी समजून घेणं महत्त्वाचे असते.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## नारळाच्या आत पाणी कुठून येते?

जगभरात अशी अनेक ठिकाणे आहे जिथे अनोखी फळे तयार होतात. ही अनोखी फळे आणि त्यांचे दुर्मिळ गुणधर्म त्यांना जगभरात प्रसिद्ध करतात. तथापि, भारत अनोख्या फळांच्या उत्पादनात मागे नाही. शेतीप्रधान देश असलेल्या भारतात, तुम्हाला अशाच प्रकारच्या दुर्मिळ फळांची विविधता आढळेल ज्यांची केवळ एक वेगळी चवच नाही तर त्यात अनेक निरोगी पोषक घटक देखील आहे. आज, आम्ही तुम्हाला अशाच एका स्वादिष्ट फळाबद्दल, नारळाबद्दलच्या या विचित्र तथ्यांबद्दल सांगणार आहोत. तुम्ही कधी विचार केला आहे का की नारळाच्या आत पाणी कुठून येते? निसर्गाचा हा चमत्कार कसा घडतो?

नारळ हे मालदीवचे राष्ट्रीय फळ आहे. हे एक प्रमुख उष्णकटिबंधीय फळ आहे जे बेट राष्ट्राच्या संस्कृती आणि अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ते मालदीवच्या लोगोचा देखील एक भाग आहे, जे तेथील लोकांसाठी त्याचे महत्त्व प्रतिबिंबित करते. इंडोनेशिया, फिलीपिन्स आणि भारत हे जगातील सर्वात मोठे नारळ उत्पादक देश आहेत. भारतात नारळाचे धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक महत्त्व खूप आहे. भारतात ते सामान्यतः 'श्रीफळ' म्हणून ओळखले जाते. नारळ शुद्धता, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानले जाते आणि ते विधी, विवाह आणि नवीन उपक्रमांच्या सुरुवातीला वापरले जाते. आरोग्य आणि उपजीविकेसाठी हे बहुमुखी पीक आहे.

नारळाचे पाणी हे झाडाच्या मुळांद्वारे जमिनीतून शोषले जाणारे भूजल आहे. ते पोषक तत्वांनी समृद्ध आहे. हे पाणी जाइलम नावाच्या संवहनी प्रणालीद्वारे खोडातून फळांपर्यंत जाते, जिथे ते झाड स्वतःच फिल्टर करते. ते वाढत्या नारळासाठी पोषक तत्व म्हणून काम करते.

नारळाच्या पाण्याची गोड चव त्याच्या नैसर्गिकरित्या होणाऱ्या साखरेमुळे असते. हे एक नैसर्गिक पेय आहे जे नारळाचे झाड बाहेरील साखरेपासून नव्हे तर मुळांमधून मातीतून पोषक तत्वे शोषून फळांमध्ये साठवते. जे खुप पौष्टीक असते.

## धीर

खूप वर्षांपूर्वी, एक पोपट त्याच्या दोन मुलांसह एका घनदाट जंगलात राहत होता. ते आनंदाने राहत होते. एके दिवशी, जंगलातून जाणाऱ्या एका शिकारीला पोपटांची एक सुंदर जोडी दिसली. त्याला वाटले की ती राजासाठी एक अद्भुत भेट असेल. त्याने त्यांना पकडले आणि राजाकडे आणले.

जेव्हा त्याने पोपट राजाला सादर केले तेव्हा राजा खूप आनंदी झाला आणि त्याने शिकारीला शंभर सोन्याचे नाणे देऊन बक्षीस दिले.

राजवाड्यात आणल्यानंतर, पोपट सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. त्यांना सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवण्यात आले होते. नोकर नेहमीच त्यांच्या मागे धावत असत. त्यांना विविध प्रकारची ताजी फळे खायला दिली जात होती. राजा त्यांना खूप प्रेम करत असे. राजकुमारही सकाळी आणि संध्याकाळी त्यांच्यासोबत खेळत असे. दोन्ही पोपटांना असे जीवन मिळाल्याने खूप आनंद झाला.

एके दिवशी, लहान पोपट मोठ्या पोपटाला म्हणाला, भाऊ, आम्ही खूप भाग्यवान आहोत की आम्हाला या राजवाड्यात आणले गेले आणि आम्हाला इतके आरामदायी जीवन मिळाले. येथे प्रत्येकजण आम्हाला खूप प्रेम करतो. ते आमची इतकी चांगली काळजी घेतात.

हो, भाऊ, इथे आपल्याला आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट कोणत्याही प्रयत्नाशिवाय मिळते. आपलं आयुष्य पूर्वीपेक्षा अधिक आरामदायी झालं आहे. सगळ्यात चांगली गोष्ट म्हणजे आपल्याला इथल्या सर्वांकडून प्रेम मिळतं.

पोपट राजवाड्यात आनंदी जीवनाचा आनंद घेत होता. पण एके दिवशी सगळं बदललं. राजाला पोपट भेट देणारा शिकारी राजदरबारात परतला. यावेळी त्याने राजाला एक काळं माकड भेट दिलं.

काळा माकड आता राजवाड्यात लक्ष केंद्रीत झाला होता. सर्व नोकर त्याची काळजी घेत होते. त्याच्या खाण्यापिण्याची विशेष काळजी घेतली जात होती. सर्वांनी पोपटांकडे लक्ष देणे थांबवले. राजकुमारही पोपटांऐवजी माकडाशी खेळू लागला.

हे पाहून लहान पोपट खूप दुःखी झाला. तो मोठ्या पोपटाला म्हणाला, भाऊ, या काळ्या माकडाने आमचे सर्व आनंद हिरावून घेतले आहेत. त्याच्यामुळे आता कोणीही आपल्याकडे लक्ष देत नाही.

मोठा पोपट म्हणाला, काहीही कायमचे नसते, माझ्या भावा. काळ लवकर बदलतो.

काही दिवस गेले. माकड खोडकर होता. एके दिवशी त्याने राजवाड्यात खूप त्रास निर्माण केला. तो नोकरांना खूप त्रास देत होता. त्याच्या कृतीने राजपुत्रही घाबरला.

जेव्हा राजाला माकडाच्या दुष्कृत्याची माहिती मिळाली तेव्हा त्याने त्याला जंगलात सोडण्याचा आदेश दिला. आदेशाचे पालन करण्यात आले आणि माकडाला जंगलात सोडण्यात आले.


त्या दिवसापासून, पोपट पुन्हा राजवाड्यात लक्ष केंद्रीत झाले. आता लहान पोपट खूप आनंदी झाला. तो मोठ्या पोपटाला म्हणाला, आमचे दिवस परत आले आहे, भाऊ.

मोठा पोपट म्हणाला, लक्षात ठेव, माझ्या भावा. वेळ कधीच सारखा राहत नाही. म्हणून, जेव्हा काळ तुमच्या बाजूने नसतो तेव्हा तुम्ही दुःखी होऊ नका. जर वाईट काळ असेल तर चांगले काळही येतील.

लहान पोपटाने मोठ्या पोपटाचा मुद्दा समजून घेतला आणि कठीण काळात धीर धरण्याचा निर्णय घेतला.

तात्पर्य : काळाबरोबर सर्व काही बदलते. म्हणून, कठीण काळात धीर धरा.

# जीवन का अमृत (भाग १)



१३९. सत्गुरु आपका सदा का साथी है, आपको हर संभव सहायता, दया और सुरक्षा प्रदान करता हुआ। जितना अधिक आप अंतर में जायेंगे, उतनी ही अधिक खुशी आप महसूस करेंगे और सत्गुरु के प्रति आपका प्रेम तथा विश्वास और अधिक मज़बूत होगा। आप अवश्य ही, सत्गुरु में पूर्ण आस्था रखकर, इस भवसागर से पार हो सकेंगे।

जब आप सत्गुरु की उपस्थिति महसूस करें और आपको लगे कि वह आपसे बातें कर रहा है, चाहे आप उसे देख नहीं पाते हों, तो कृपया पवित्र नामों का जाप अवश्य करें, ताकि ऐसा न हो कि आप किसी विरोधी शक्ति के असर में आ जाएँ, जो कि आपकी रूहानी तरक्की में रुकावट डालने की कोशिश कर रही हो।

## ध्यानधारणा

१४०. कृपया ध्यान दें कि आध्यात्मिकता का अर्थ सम्मोहन विद्या या प्रेतात्मावाद नहीं है। ध्यान के समय जब आपने अपना हाथ सत्गुरु के हाथ में रखा एवं अपने मन को सिर के ऊपरी भाग पर टिकाया, तो इससे आपको ठंडक महसूस हुई। इस प्रक्रिया को दोहराएँ नहीं, क्योंकि इससे आपकी आध्यात्मिक उन्नति में बाधा पड़ सकती है। अंतर में पवित्र नाम के साथ जुड़ने की आसान प्रक्रिया ही आपका असली लक्ष्य होना चाहिए। बाकी और किस्म के ध्यान के तरीकों को नारअंदाज करो। कृपया ध्यान दें कि विभिन्न साधुओं द्वारा, निचले चक्रों को खोलने के लिए, जो अलग-अलग ध्यान के तरीके बताए गए हैं, वे खतरनाक हैं और बिना सोचे समझे उनका प्रयोग नहीं करना चाहिए।

इसी प्रकार कुंडलिनी का जाग्रत होना भी, जैसा कि पुस्तक योग : एक तुलनात्मक अध्ययन में समझाया गया है और कुछ समय पहले आपने अनुभव किया था, खतरनाक परिणामों से भरा है। इससे शरीर में गर्मी पैदा (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

इसी लिये देते हैं। क्योंकि वह जानता पढ़ते रहेगें तो बुद्धि अपडेट होती रहेगी और सभी विकास के कार्य करते रहेंगे। पांच मुख्य व पांच सूक्ष्म विकारों से उत्पन्न विघ्न और कुछ नहीं सिर्फ कमजोर बुद्धि के कारण उत्पन्न होते हैं।

आज्ञा चक्र - ८७ - बुद्धि -३

बुद्धिमता प्राप्त करना सब से कीमती गुण है। यह जीवन हमें सीखने, सावधानी पूर्वक विश्लेषण करने और बुद्धि से सोच कर चलने का अभ्यास करने के लिये मिला है। आप सबसे ऊंचे स्तर पर शिक्षक हो या अपने क्षेत्र के विशेषज्ञ हो, आपकी शिक्षा पूरी नहीं हुई है। आप को हर रोज जब तक जीवित हैं नया कल्याणकारी साहित्य पढ़ना है। जब हम विभिन्न परिस्थितियों से गुजरते हैं तो सीखते हैं। हर परिस्थिति से सीख क्या मिली सिर्फ यही दिमाग में रखना है।

## विशेषज्ञ

जब एक परिस्थिति में रहने का चुनाव करते हैं तब असफल होते हैं। यह एक तरह की बुद्धि की मृत्यु है। लगातार व्यस्त रहने से, कार्य स्थल पर आदर्श तो बन सकते हैं, परंतु बुद्धिमान नहीं। दिन में कम से कम एक बार रुक कर आराम करो। खाली समय को भटकाव की बजाय कुछ सीखने में लगाओ। ऐसे लोग खोजें जिनका आप सम्मान करते हैं और उनके मूल्य और आदर्श जिन का वह प्रचार करते हैं उसे फालो करना है। महान लोगों के लेख पढ़ो। अपने आप को ऐसे लोगों से घेर लीजिये जो आप को सुनना चाहते हैं।

आप उनके प्रति खुले रहें और वह आप के प्रति खुले रहेगें। अपनी ताकत को बढ़ाने के लिये दूसरो की ताकत से जुड़ जाना बुद्धिमता है। सीखने को दूसरो के विरुद्ध रुकावट के रुप में इस्तेमाल करने के लालच से बचें। यदि आप वर्षों से अपने स्वयं के बजाय किसी और के मापदंडों के अनुसार जो सही था वह करते आ रहे हैं तो आप स्वयं के प्रति जिम्मेवार नहीं हैं। आप

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टर (ऑपरेशन केल्यानंतर) : तुम्ही उद्या तुमच्या कुटुंबाला भेटू शकता.
रुग्ण : पण डॉक्टर, माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य हयात नाहीत
डॉक्टर : मला माहित आहे... म्हणूनच मी हे सांगत आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणता देश जगातील जैव इंधन उत्पादक देश आहे?

\- भारत

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

१५. ताकामध्ये लॅक्टोबॅसिलस असल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून विविध आजारांची लागण रोखली जाते. तसेच पचनसंस्थेच्या तक्रारी उद्भवत नाहीत.

१६. शरीरात चांगल्या कोलेस्टेरॉलची निर्मिती होऊन हृदयरोग टाळण्यासाठी नियमितपणे रोज दोन ग्लास ताक प्यावे.

१७. आयुर्वेदामध्ये ताकाचे पुढील प्रकार सांगितले आहेत.

१) तक्रं, २) उश्वित, ३) मथित, ४) दंडाहत/कालशेय, ५) करकृत, ६) श्वेतमंथ, ७) मलिन घोल आणि ८) खांडव. याच्या वेगवेगळ्या गुणधर्माप्रमाणे त्याचा विविध रोगांवर उपयोग केला जातो.

१) तक्रं - विरजण लावून तयार झालेल्या दह्यात पाणी घालून घुसळल्यावर त्यातील लोणी काढावे. त्यानंतर शिल्लक राहिलेल्या ताकात एक चतुर्थांश पाणी घालावे. यालाच तक्रं किंवा ताक असे म्हणतात. हे बलवर्धक व ग्राही गुणधर्माचे असते.

## अमृततुल्य

२) उदश्वित - अर्धे पाणी मिळसलेल्या ताकास उश्वित म्हणतात. ते कफकारक, बलवर्धक व आमनाशक असते.

३) मथित - केवळ घुसळलेले दही. यामध्ये पाणी घालत नाहीत. हे त्रिदोषघ्न असून उष्ण असते. जुलाब, अर्श व संग्रहणीवर मठ्ठा (मथित) हितकारक असतो.

४) दंडाहत/कालशेय:

हे दोनही प्रकार म्हणजे लांब दांड्याच्या रवीने कमी-अधिक वेळ तयार केलेले ताक.

५) करकृत् -

यामध्ये रवीचा वापर न करता हाताने घुसळून तयार केलेले ताक म्हणजे करकृत् होय.

६) श्वेतमंथ -

ज्या ताकाचा फेस पांढराशुभ्र आहे, त्याला श्वेतमंथ म्हणतात.

७) मलिन/घोल - घुसळून तयार केलेले ताक.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# न्यू आर्टस् कॉलेजच्या 'सेंटर ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीज' विभागात विद्यार्थ्यांसाठी २० तासांचे 'विशेष व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण'



न्यू आर्टस् कॉलेजच्या 'सेंटर ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीज' विभागात विद्यार्थ्यांसाठी विशेष व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे आदी.

नगर – भविष्यातील कॉर्पोरेट आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थ्यांनी केवळ पदवीवर अवलंबून न राहता आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे काळाची गरज आहे, हे ओळखून न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज मधील सेंटर ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीज आणि नांदी फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संगणक शास्त्र विभागाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

विशेषतः, ग्रामीण भागातील विद्यार्थिनींमधील व्यावसायिक कौशल्ये (Soft Skills) विकसित करण्यासाठी 'महिंद्रा' समूहाने पुढाकार घेतला आहे. महिंद्रा समूहाच्या आर्थिक सहकार्यातून साकारलेल्या 'महिंद्रा प्राईड क्लासरूम' (Mahindra Pride Classroom) आणि नांदी फाउंडेशन यांच्या संयुक्त मोहिमेअंतर्गत हे प्रशिक्षण राबवण्यात आले. केवळ तांत्रिक शिक्षणावर मर्यादित न राहता, ग्रामीण भागातील मुलींना कॉर्पोरेट जगासाठी सक्षम करणे आणि त्यांच्यातील रोजगारक्षमता वाढवणे, हा या भागीदारीचा मुख्य उद्देश आहे.

या प्रशिक्षणासासाठी नांदी फाउंडेशन येथून तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्रीमती लक्ष्मी, कुमारी तानिया आणि श्रीमती मनीषा यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्य प्रशिक्षक श्रीमती लक्ष्मी यांनी एकूण ५ ते ६ सत्रांमध्ये कॉर्पोरेट जगतातील सॉफ्टस्किलचे महत्त्व सविस्तरपणे मांडले. त्यांनी प्रभावी संवाद कौशल्य, मुलाखती दरम्यानची योग्य वेशभूषा आणि देहबोली यावर सखोल मार्गदर्शन करतानाच, कार्पोरेट कंपन्यांमध्ये केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नसून गटचर्चा, सादरीकरण कौशल्य आणि टीम वर्कला किती प्राधान्य दिले जाते, हे विविध प्रात्यक्षिकांद्वारे पटवून दिले. जागतिक बाजारपेठेत स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी व्यावसायिक शिष्टाचार, ईमेल रायटिंग आणि वेळेचे नियोजन या गोष्टी किती अनिवार्य आहेत, याचे सखोल प्रशिक्षण त्यांनी या सत्रांमधून दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी अनेक प्रेरणादायी उदाहरणे दिली.

प्राचार्य सागडे म्हणाले की, यशाचे शिखर गाठण्यासाठी सकारात्मक मानसिकता ही पहिली पायरी असून विद्यार्थ्यांनी आपल्या मेंदूमधील निरोपयोगी आणि नकारात्मक विचारांचा कचरा काढून टाकला पाहिजे. जेव्हा तुम्ही एक निश्चित ध्येय समोर ठेवता आणि सकारात्मक ऊर्जेने त्याचा पाठलाग करता, तेव्हाच ध्येयप्राप्ती होते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सेंटर ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीजचे विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांनी आपल्या मनोगतातून या प्रशिक्षणाचे दूरगामी महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, अशा प्रकारच्या अद्ययावत कार्यशाळांमुळेच आमचे विद्यार्थी 'इंडस्ट्री–रेडी' होत आहेत. आगामी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील प्रवेश प्रक्रियेसाठी सज्ज होताना, आमचा विभाग विद्यार्थ्यांना केवळ पदवी मिळवून न देता त्यांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे. महाविद्यालयातील अशा अभिनव उपक्रमांमुळेच गुणवंत विद्यार्थी या विभागाकडे आकर्षित होत आहेत, असा गौरवपूर्ण उल्लेखही त्यांनी केला.

याप्रसंगी प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी साक्षी दहिफळे, सानिका त्रिभुवन, वैष्णवी भाकरे आणि संस्कृती रावत यांनी या सॉफ्टस्किल प्रशिक्षणाबद्दलचे आपले अनुभव कथन केले. या कार्यशाळेमुळे मुलाखतीची भीती कमी होऊन व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होण्यास मोठी मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण तीन दिवसीय प्रशिक्षणाचे अत्यंत नियोजनबद्ध समन्वय प्राध्यापिका प्रियंवदा पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. समारोप प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सत्संगती

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

संत, तत्त्वज्ञ, विचारवंत आणि महापुरुषांनी मानवी जीवनात सत्संगतीला खूप मोठे स्थान दिले हे. मानवी जीवन ही संस्काराची प्रयोगशाळा आहे. या संस्काराच्या प्रयोगशाळेतूनच संस्कृती नावाचे साध्य उभे राहते. विचारप्रणाली आणि जीवनप्रणाली यांचा मधुर संगम म्हणजे संस्कृती होय. व्यवहारी जीवनात काही गोष्टींमुळे येणारी मलिनता धुऊन जीवनाला शुद्ध करणारी प्रक्रिया म्हणजे संस्कृती होय.

संस्कार उभे राहतात ते सत्संगतीतून. संग हा शब्द जोडणं, आसक्ती याअर्थी वापरला जातो. जगात सत् आणि असत् या दोन अवस्था आहेत. सत्चा संग जडला की सत्संग घडतो आणि सत्संगतीने जीवनच परिवर्तित होते. सातव्या शतकात होऊन गेलेला राजा भर्तृहरी आजही सुभाषितांतून, बोधवचनातून, बोधवाक्यातून आम्हाला दिसतो. भर्तृहरीने नीतिनाशक, वैराग्यनाशक आणि शृंगारनाशक अशी तीन शतके लिहून शतककाव्याची परंपरा निर्माण केली. त्याच्या नीतिशतकातील अनेक श्लोक हे 'नीतिशास्त्रप्रमाणे' म्हणून लोकप्रिय ठरले आहेत. राजा भर्तृहरीने नीतिशतकातील एका श्लोकात सत्संगतीचे महत्त्व विशद केले आहे.

'जाड्यं धियो हरति सिंचति वाचि सत्यं।'

अशी सुरुवात करून तो म्हणतो 'सत्संगतीने बुद्धिचा जडपणा नाहीसा होतो. वाणीत सत्यता येते. त्या सत्यत्वाने लोकजीवनात मान वाढतो.' शेवटच्या चरणात तो सांगतो, 'सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम।' सत्संगती मनुष्यास काय बरे देत नाही?


मानवी जीवनात दुर्गुण आहेत, विकार आहेत, आसक्ती आहे पण या सर्वांवर मात करण्यासाठी इथेच सत्संगतीही दिली आहे. मानवी जीवनाला उत्तुंगतेकडे नेणारी आणि त्याच उत्तुंगतेवर विराजमान ठेवणारी सत्संगती हे मानवी जीवनाला मिळालेले एक वरदान आहे. ज्ञानदेवांनी एक सुंदर रूपक मांडले आहे.

**लोहाचे कनक जाहले।**
**हे एके परिसेचि केले।**
**आता आणिक कैचे ते गेले। लोहत्त्व आणी ।।**

परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते. जे लोखंड परिसस्पर्शाने सुवर्णावस्थेला गेले आहे, ते आणखी कशाचाही स्पर्श झाला तरी पुन्हा लोखंड होईल का? सत्संगतीच्या परिसस्पर्शाने एकदा का जीवनाचे सोने झाले की काय बिशाद की पुन्हा तो त्या पातळीवरून खाली घसरेल? सत्संगती मानवी जीवनाला मूल्याधिष्ठित उत्तुंगतेकडे नेते आणि तेथे स्थिरावते. सत्संगतीचा हा आनंद काही वेगळाच.

**– किशोर गांधी**

# महाराष्ट्र साहित्य परिषदेवर अहिल्यानगरचे जयंत येलुलकर, प्रा. गणेश भगत बिनविरोध

नगर – महाराष्ट्रातील मराठी भाषेची पालक संस्था असलेल्या १२० वर्षांची समृद्ध परंपरा असलेल्या पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जिल्हा प्रतिनिधि पदाच्या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत येथील महाराष्ट्र साहित्य परिषद, सावेडी उपनगर शाखेचे प्रमुख कार्यवाह व रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर व गणराज प्रकाशनचे प्रा. गणेश भगत यांची बिनविरोध निवड झाली आहे.

येलुलकर हे यापूर्वीही परिषदेवर निवडून आले आहेत, प्रा. डॉ. गणेश भगत यांची परिषदेवर प्रथमच निवड झाली

नरेंद्र फिरोदिया अध्यक्ष असलेल्या मसाप च्या सावेडी उपनगर शाखेच्या माध्यमातून त्यांनी मराठी भाषेची चळवळ जोमाने उभी करीत फिरोदिया यांच्या नैतृत्वाखाली राज्यस्तरीय विभागीय साहित्य संमेलन, बाल साहित्य संमेलन, राज्यस्तरीय युवा साहित्य नाट्य संमेलनाचे यशस्वी आयोजन करीत अहिल्यानगरचा साहित्य क्षेत्रात ठसा उमटवला आहे. प्रा. डॉ. गणेश भगत यांची परिषदेवर प्रथमच निवड होत असून त्यांच्या गणराज प्रकाशनाच्या माध्यमातून त्यांनी दोनशे पुस्तके प्रकाशित केले असून त्यांची स्वतःची वीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. साहित्य क्षेत्रात तळमळीने काम करणारा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख असून, प्रा. भगत हे न्यू आर्ट्स कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.


स्वाध्याय शिबिरासाठी विवेकानंद केंद्राकडे रवाना होणाऱ्या स्वाध्यायिकांचा सत्कार करण्यात आला.

# स्वाध्याय शिबिरासाठी विवेकानंद केंद्राकडे रवाना होणाऱ्या स्वाध्यायिकांचा सत्कार

नगर – स्वामी विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी येथे आयोजित स्वाध्याय शिबिर प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या स्वाध्यायिकांचा चंदन परिवारातर्फे आनंदाने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी स्वाध्यायाच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य करणार्या स्वाध्यायिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या सत्कार समारंभास सुभाष, विजय, रमेश, विलास, मनोज गुंदेचा परिवारासह सौ. छायाताई गांधी, प्रकाश कुंकोलेळ, गांधी, सतीश गांधी नेवासा, राकेश मेहेर, सुरेश मुनोत, सुभाष भंडारी, लाभेश चोपडा तसेच गांधी नेवासकर उपस्थित होते. उपस्थितांनी स्वाध्यायिकांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावर्षी देशभरातील सुमारे १८० ठिकाणांहून जवळजवळ ४०० स्वाध्यायिक स्वामी विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी येथे स्वाध्याय प्रशिक्षणासाठी रवाना झाले आहेत. हे सर्व स्वाध्यायी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विविध भागांमध्ये जाऊन स्वाध्याय, सेवा व संस्कारांचे कार्य करणार आहेत.

# श्री गुरु तेग बहादूरजींच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर


सुवर्णा पवार | अक्षय महाजन | दुर्गेश चिलवर | अजितकौर वधवा

नगर – श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान, (घर घर लंगर सेवा) अहिल्यानगर तर्फे श्री गुरु तेग बहादूरजींच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. स्पर्धेला राज्यभरातून प्रतिसाद लाभला. श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या जीवन कार्यावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या जीवनातील कार्य व त्यांनी दिलेला संदेश समाजा पर्यंत घेऊन जाण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमुळे गुरु तेग बहादूरजींच्या अमर त्यागाचा, धार्मिक स्वातंत्र्याचा व मानवतेच्या संदेशाचा प्रभावी प्रसार करण्यात आला आहे. स्पर्धेसाठी श्री गुरु तेग बहादूरजी यांनी धर्मासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान आणि विविधतेतील एकता, गुरु तेग बहादूरजी यांचे जीवन हे विषय देण्यात आले होते.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक सुवर्णा दीपक पवार (अहिल्यानगर), द्वितीय– अक्षरा किशोर महाजन (वसमत, जि. हिंगोली), दुर्गेश किशोर चिलवर (जालना), तृतीय– अजितकौर बलजीतसिंग वधवा (अहिल्यानगर) आणि उत्तेजनार्थ– स्नेहल छाजेड (अहिल्यानगर) तसेच पूणे, श्रीरामपूर व नागपूर येथील सहभागी स्पर्धकांना उत्तेजनार्थ म्हणून घोषित करण्यात आले आहे. पहिल्या तीन स्पर्धकांना अनुक्रमे २५०१, १५०१ आणि ५०१ रुपयाचे बक्षीस दिले जाणार आहेत.

गुरु तेग बहादूरजींच्या ३५० व्या शहिदी शताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यासाठी जनक आहुजा, गुलशन कंत्रोड, प्रितपालसिंग धुप्पड, मुन्ना जग्गी, सतीश गंभीर, हरजीतसिंग वधवा यांनी प्रायोजक म्हणून सहकार्य केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजेंद्र कंत्रोड, प्रशांत मुनोत, राजू जग्गी, सुनील थोरात, सोमनाथ चिंतामणी, राजा नरंग, कैलाश नावलानी, सनी वाधवा, सिमरजीतसिंग वाधवा, मनोज मदन, प्रमोद पंटम, शरद बेरड, राहुल बजाज, जय रंगलानी, राजेश कुकरेजा, दामोदर माखिजा, सुनील मेहतानी, कैलाश लालवाणी, किशोर मुनोत, अर्जुन मदन, अभिमन्यु नय्यर, जतिन आहुजा, किशोर रंगलानी, दलजीतसिंग वधवा यांनी परिश्रम घेतले.



नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथे राधाकृष्ण मंदिरात भगवान विश्वकर्मा जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अक्षय कर्डिले बोलत होते.

# विश्वकर्मा मंदिर उभारणीसाठी आवश्यक सहकार्य करणार

### अक्षय कर्डिले यांचे आश्वासन; बुऱ्हाणनगर येथे पांचाळ सुतार समाजाच्यावतीने जयंती साजरी

नगर – बुऱ्हाणनगर, नागरदेवळे परिसरात विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज मोठ्या संख्येने असून गुण्यागोविंदाने राहत आहे. अतिशय धार्मिक वृत्तीचा असल्याने या समाजाकडून नेहमीच विविध कार्यक्रम घेतले जातात. या समाजाला विश्वकर्मा मंदिर उभारणीसाठी ग्रामपंचायतीमार्फत योग्य जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. मंदिरासाठी आवश्यक सहकार्य करू, अशी ग्वाही भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.

नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथे राधाकृष्ण मंदिरात भगवान विश्वकर्मा जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अक्षय कर्डिले बोलत होते. याप्रसंगी सरपंच रावसाहेब कर्डिले, संदीप कर्डिले, नागरदेवळेचे सरपंच राम पानमळकर, सुशिल तापकिरे आदी उपस्थित होते. जयंती निमित्त हभप शंकर महाराज गणगे यांनी किर्तन सेवा दिली. त्यांना हरिहर वारकरी शिक्षण संस्था मल्लिनाथ महाराज सूर्यवंशी, निंबळक यांनी साथ दिली. मुख्य पूजेचे यजमान वनिता व बालाजी कलमदाणे होते. किर्तनानंतर भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

या सोहळ्यासाठी हभप आशाताई गरूड, हभप मोहिते महाराज, हभप रामभाऊ खर्से, शामराव कलमदाणे, किशोर दुधाले, सुभाष दुधाले, दशरथ कलमदाणे, राजेंद्र कलमदाणे, साईनाथ दुधाले यांचै मार्गदर्शन तर हभप संतोष महाराज कलम दाणे, गोकुळ कलमदाणे, संतोष दुधाले, कन्हैया कलमदाणे, दत्तात्रय नगरकर, अरूण जमदाड, युवराज दुधाले, विश्वकर्मा समाजाचे शहराध्यक्ष देवेंद्र दुधाले, सरचिटणीस बाणेश्वर कलमदाणे, संतोष दुधाले, ईश्वर दुधाले, शंकर कलमदाणे, गणेश दुधाले, साईबाबा दुधाले, शिवाजी धरणकर, संतोष धरणकर, लक्ष्मण तांबट, रामेश्वर तांबट, अविनाश कलमदाणे, सचिन कलमदाणे, रवी धरणकर, शिवदीप कलमदाणे, योगेश दुधाले, राहुल दुधाले, वैभव दुधाले, शुभम दुधाले, गौरव दुधाले, अमृत क्षीरसागर, रामदास सुरंगकर, अभिषेक कलमदाणे, अक्षय कलमदाणे, विनायक क्षीरसागर, घनश्याम वाकचौरे, रमेश सरोदे, शिवाजी कलमदाणे, सोमनाथ झेलकर, ओंकार तांबट, महेश नगरकर, शुभम तांबट आदींसह समाजबांधवांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# जिल्हा न्यायालयात महिला वकीलांचा हळदी-कुंकू सोहळा उत्साहात; वकील व पोलीस अधिकाऱ्यांनी घेतली बालविवाहमुक्त जिल्ह्याची शपथ

### बालविवाहमुक्त अहिल्यानगरसाठी महिला वकील व पोलीस अधिकाऱ्यांचा निर्धार : अॅड. अनुराधा येवले यांचे प्रतिपादन


जिल्हा न्यायालय परिसरात महिला वकीलांचा पारंपरिक हळदी–कुंकू कार्यक्रम उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेत पार पडला. या सोहळ्यात उपस्थित सर्व महिला वकील व पोलीस अधिकारी यांनी बालविवाह मुक्त भारत घडविणे या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्याचा संकल्प करत शपथ घेतली.

नगर – अहिल्यानगर येथील जिल्हा न्यायालय परिसरात महिला वकीलांचा पारंपरिक हळदी–कुंकू कार्यक्रम उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेत पार पडला. या सोहळ्यात उपस्थित सर्व महिला वकील व पोलीस अधिकारी यांनी बालविवाह मुक्त भारत घडविणे या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्याचा संकल्प करत शपथ घेतली.

हा उपक्रम बाल कल्याण समितीच्या सदस्या अॅड. अनुराधा दिनेश येवले यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात जिल्हा न्यायालयातील सर्व महिला वकील सहभागी झाल्या होत्या. कोतवाली पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वंदना फाटके पाटील–जगताप उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर सहाय्यक पोलीस निरीक्षक पुनम श्रीवास्तव, अॅड. स्वाती पाटील, अॅड. जया पाटोळे, अॅड. मनीषा केळगंद्रे, अॅड. मनीषा डूबे पाटील, अॅड.सुजाता कोठारी, अॅड. बागेश्री जरंडिकर, महिला सचिव अॅड. सारिका झरेकर, कार्यकारणी सदस्य अॅड. प्राजक्ता करांडे, अॅड. सुजाता पंडित, अॅड. निरू काकडे, अॅड. कुंदा दांगट, अॅड. शिल्पा शेळके, अॅड. रूपाली पठारे, अॅड. पल्लवी होनराव आदी उपस्थित होत्या.

या सोहळ्यात अॅड. अनिता दिघे, अॅड. वृषाली तांदळे, अॅड. भक्ती शिरसाट, अॅड. अर्पिता झरेकर, अॅड. मनीषा पंडुरे, अॅड. आशा गोंधळे, अॅड. सुचेता कुलकर्णी, अॅड. अरुणा राशिनकर, अॅड. सुनिता गोरडे, अॅड. रिजवाना शेख, अॅड. करुणा शिंदे, अॅड. यास्मिन शेख आदी महिला वकिलांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे तोफखाना पोलीस स्टेशन, कोतवाली पोलीस स्टेशन, तालुका पोलीस स्टेशन तसेच भिंगार पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा देखील सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अॅड. अनुराधा येवले म्हणाल्या की, न्यायालयात कार्यरत महिला वकील कामाच्या व्यापात इतक्या व्यस्त असतात की, एकमेकींशी संवाद साधण्याची संधीही मिळत नाही. अशा कार्यक्रमांमुळे महिला वकील एकत्र येऊन विचारांची देवाण–घेवाण करतात. न्यायिक क्षेत्रात महिला वकील प्रामाणिकपणे कार्य करत असून उपेक्षित व दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी मोलाची भूमिका बजावत आहेत. बालविवाहमुक्त अहिल्यानगरसाठी महिला वकील व पोलीस अधिकाऱ्यांचा निर्धार करण्यात आला आहे. महिला वकीलांचा हळदी–कुंकूचा उपक्रम मागील १५ वर्षापासून विविध सामाजिक उपक्रमाने साजरा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात म्हणाल्या की, समाजात बदल घडविण्यासाठी कायदे जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच सामाजिक संवेदनशीलतेचे योगदानही आवश्यक आहे. बालविवाह ही केवळ कायद्याचीच नव्हे तर समाजाचीही गंभीर समस्या आहे. आज महिला वकील आणि पोलीस अधिकारी एकत्र येऊन बालविवाहमुक्त जिल्ह्याचा संकल्प करीत आहोत, ही बाब अत्यंत प्रेरणादायी आहे. कायद्याची अंमलबजावणी करताना समाजप्रबोधनही तितकेच आवश्यक आहे. महिला वकील या समाजाच्या पायाभूत बदलासाठी प्रभावी भूमिका बजावत असून पोलीस प्रशासन त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे आहे. अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी आपण सर्वजण मिळून नक्कीच यशस्वी होऊ, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.


डॉ. वंदना फाटके पाटील–जगताप म्हणाल्या की, आजचा हळदी–कुंकूचा सोहळा हा केवळ परंपरेपुरता मर्यादित न राहता आरोग्याबाबत जागृतीचा सोहळा साजरा होणे आवश्यक आहे. महिला ही कुटुंबाची महत्त्वाची घटक असते. तिचे आरोग्य चांगले असल्याचे कुटुंबाचे आरोग्य देखील चांगले राहण्यास मदत होते. महिला वकीलांसाठी अरुणोदय हॉस्पिटलच्या माध्यमातून शिबिर घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले.


या कार्यक्रमासाठी महिला वकील प्रिया खरात, सुरेखा भोसले, अनुजा काटे, सारिका खाकाळ, सविता साठे, मीनाक्षी कराळे, संगीता पाडळे, कौन्सिलर संगीता सुसर, रुबीना पठाण, मुबीना जहागीरदार, प्रज्ञा उजागरे, विमल खेडकर, भावना पालीकुंडवार, दीक्षा बनसोडे, मोनाली कराळे, अर्चना राऊत, पल्लवी गीते, गिरीजा गांधी, मीना भालेराव, सुजाता कुमार, ज्योती ठुबे, सोनल वेलदे, ज्योती हिमणे, काकडे, सुविद्या तांबोळी, मीना शुक्रे, लता गांधी, शितल दुसुंगे, अरुंधती कांबळे, मनीषा जाधव, गौरी सामलेटी, ज्योत्सना ससाने, स्नेहल लोखंडे, शिल्पा राजपूत, पल्लवी बारटक्के, शकुंतला मोरे, पुरी मॅडम आदींसह महिला वकील उपस्थित होत्या.


अॅड. अरुणा राशिनकर यांनी आभार मानले. यावेळी महिलांना दैनंदिन जीवनात उपयुक्त असे वाण देण्यात आले तसेच झाडे लावा, झाडे जगवा असा पर्यावरणपूरक संदेश देण्यात आला.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : ३१ जानेवारी ते ०५ फेब्रुवारी २०२६


क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम 8.00 AM 2.00 PM


बॉर्डर २ 8.00 AM 11.35 AM 3.10 PM 6.45 PM 10.45 AM 2.20 PM, 6.00 PM 9.40 PM, 10.20 PM


मर्दाणी ३ 9.00 AM 11.30 AM 4.45 PM 10.00 PM


अगं अगं सुनबाई काय म्हणताय सासूबाई 7.15 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001



ॲडव्हान्स बुकिंग सुरू

my cinema
AHILYANAGAR'S 1ST
5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
Show :- Dt. 02/01/2026 & 05/02/2026


BORDER 2
8:30, 12:00, 3:30, 6:00, 8:15, 9:30, 10:00 pm


MARDANI -3
1:00, 3:30, 7:00, 9:30 pm

AGA AGA SUNBAI KAY MHANTAY SASUBAI? (Marathi) - 11:55 am, 2:30, 5:15 pm.
KRANTIJYOTI VIDYALAYA (Marathi) - 10:30 am.

Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.




दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : ३१ जानेवारी ते ०५ फेब्रुवारी २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

SCREEN - 1
बॉर्डर २ 12.00 PM (Rs. 200)
मर्दाणी ३ 3.30 PM (Rs. 200) 9.00 PM (Rs. 200)
अगं अगं सुनबाई काय म्हणताय सासूबाई 6.15 PM (Rs150)

SCREEN - 2
बॉर्डर २ 10.00 AM (Rs. 120) 1.30 PM (Rs. 200) 5.00 PM (Rs. 200) 9.00 PM (Rs. 200)





कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर



नामांकित कंपन्यांचे आकर्षक वॉटर हीटर!


आजच भेट द्या!

Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
8975979999 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE


## जाहीर नोटीसीस उत्तर

तमाम लोकास या जाहीर नोटीसीच्या उत्तराने कळविण्यात येते की, ॲड. किरण एम. सोनी यांचेमार्फत सय्यद फैय्याज अजिमोद्दिन, सय्यद इरफान अजिमोद्दिन, सय्यद मैमुनाबेगम मीर करीमोद्दिन हाजीमीर शरीफोद्दिन, हाजी मीर शमशोद्दीन करीमोद्दिन कवीजंग जहागीरदार, मीर शफियोद्दिन करीमोद्दिन कवीजंग जहागीरदार, अजगरीबेगम सय्यद रसूल (मयत वारस अ) सय्यद नुरमोहंमद रसूल मयत वारस अ१) फरजाना नुरमहंमद रसूल सय्यद अ२) उसामा नुरमहंमद रसूल सय्यद अ३) जेबा नुरमहंमद रसूल सय्यद ब) सय्यद आसिफ रसूल क) रशिदा बेगम शेख सादीक सर्व रा- मंगल-गेट, अहिल्यानगर यांनी मौजे सावेडी येथील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. १८८, १८९ व १९० याचा नवीन सर्व्हे नं. २१५, २१६ व २१७ व हल्लीचा फायनल प्लॉट नं. १ यांचे क्षेत्रफळ १,१३,९०० चौ. मी. या मिळकतीबाबत जाहीर नोटीस देऊन सदरची मिळकत त्यांना कै. मीर अजिमोद्दिन शरीफोद्दिन कविजंग जहागीरदार यांनी मृत्युपत्रान्वये मिळालेली आहे व ते एकटेच सदर मिळकतीचे मालक आहेत असा उल्लेख केलेला आहे. सदरची बाब हि पुर्णत चुकीची असुन त्यांना कोणत्याही कोर्टाने ते एकमेव मालक असल्याबाबत निकाल दिलेला नाही याउलट आमचे आशिल निसारोद्दिन मुनिरोद्दिन जहागिरदार यांचे वडील कै. मुनिरोद्दिन शरीफोद्दिन जहागिरदार यांना मे. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ यांनी दुसरे अपील नं. ११६८/१९६६ मध्ये वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये तसेच इतर अन्य मिळकतीमध्ये हिस्सा ठरवुन दिलेला आहे व सदरचा निकाल हा आजपावेतो कायम आहे व त्या निकालाच्या अनुषंगाने आमच्या आशिलाचा सदरच्या मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क व आधिकार प्रस्थापित झालेला होता व आहे. तसेच सदरच्या मिळकतीमध्ये आमच्या आशिलांचा १/२ हिस्सा आहे. कै. मीर अजिमोद्दिन शरीफोद्दिन कविजंग जहागिरदार यांचे तथाकथित मृत्युपत्र कोणत्याही कोर्टाने ग्राह्य धरलेले नसुन त्यांची सदरची बाब फेटाळण्यात आलेली आहे. .रे. मु. नं. ३३८/२०१८ चा दावा हा मुळातच बोगस, बेकायदेशीर असुन लवकरच तो निकाली निघणार आहे. सदरच्या दाव्यामध्ये मालकी हक्काबाबत कोणताही आदेश झालेला नाही. त्यामुळे आमचे आशिल आजही सदरच्या मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत व त्यांना सदरच्या मिळकतीचा उपभोग घेण्याचा कायद्याचे पुर्णत हक्क व आधिकार आहे. सय्यद फैय्याज अजिमोद्दिन वगैरे यांनी सदरची नोटीस हि केवळ लोकांच्या मनामध्ये भिती निर्माण करण्यासाठी दिलेली असुन त्यांचा आमच्या आशिलांच्या सदर मिळकतीमध्ये असलेल्या मालकी हक्काशी कोणताही हक्क व हितसंबंध याउलट सदर इसमांनी आमच्या आशिलांचे वडील कै. मुनिरोद्दिन शरीफोद्दिन जहागिरदार यांचेकडून मौजे सावेडी येथील स. नं. ८७/अ मधील काही प्लॉटबाबत कै. मुनिरोद्दिन जहागिरदार यांच्या अर्ध्या हिश्याचे खरेदीखत करून घेतलेले आहे. यावरून त्यांनी आमच्या आशिलांचा स. नं. ८७/अ तसेच फायनल प्लॉट नं. १ मध्ये अर्धा हिस्सा असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे त्यांनी याप्रकारे जाहीर नोटीस देऊन केवळ लोकांची दिशाभुल करून व संपुर्ण सत्यपरिस्थिती नमुद न करता केवळ गैरहेतुने प्रेरीत होऊन सदरची नोटीस दिली आहे. त्यामुळे सदरची नोटीस हि पुर्णत चुकीची माहिती देणारी व संपुर्ण परिस्थिती समोर न आणणारी असुन केवळ आमच्या आशिलांना त्रास देण्याच्या गैरउद्देश्याने दिलेली दिसुन येत आहे. त्यामुळे सदरच्या नोटीसीस कोणीही फारसे महत्व देऊ नये. **दि. ०२/०२/२०२६**

**ऑफिस**
**नं. २०१, कोर्टयार्ड बिल्डिंग, तारकपूर बस स्टॅन्ड समोर, अहिल्यानगर**

ॲडव्होकेट
**वैभव वासुदेव भापकर**
B.com, LL.B, Dip.Cyb. Law
मो. नं. 9890907282


An ISO 9001:2015 Certified
दिशा COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training

कोणताही कोर्स फक्त 1450/-

BIG DISCOUNT DAYS 18th to 27th Jan

MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST | 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP | ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++ | CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION

दिल्ली गेट शाखा
9371051769
जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, मिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769




## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **१. इरफान बाबासाहेब बागवान २. आरिफ बाबासाहेब बागवान ३. रेहाना बाबासाहेब बागवान सर्व रा. ब्राम्हण गल्ली, माळीवाडा, अ. नगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **१५ दिवसांचे आत** खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

### परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन:**

डि.।। अहिल्यानगर/अहमदनगर सब. डि.।। शा ता. अहिल्यानगर /अहमदनगर जिल्हा परिषद हददीतील मौजे **बुरुडगांव** येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

**सर्व्हे नंबर ५०/१/२ चे क्षेत्र १ हे. २० आर याचा आकार १ रु ५६ पैसे यापैकी विद्यमान मालक नं. १ यांचे ०हे. ०२ आर, विद्यमान मालक नं२ यांचे ०हे.०१ आर व विद्यमान मालक न. ३ यांचे ०हे.०१ आर असे एकुण ०हे.०४ आर मिळकतीबाबत. याचे नियोजित प्लॉट नं. २३, २४, २५ व २६ असे आहे.**

| नियोजित प्लॉट नं. | क्षेत्र चौ. फूट. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| २३ | १०००.०० | ६.२० मीटर रस्ता | नि.प्लॉट नं. २४ | नि.प्लॉट नं. २६ | नि.प्लॉट नं. २२ |
| २४ | १०००.०० | ६.२० मीटर रस्ता | ६.२० मीटर रस्ता | नि.प्लॉट नं. २५ | नि.प्लॉट नं. २३ |
| २५ | १०००.०० | नि.प्लॉट नं. २४ | ६.२० मीटर रस्ता | ६.२० मीटर रस्ता | नि.प्लॉट नं. २६ |
| २६ | १०००.०० | नि. प्लॉट नं. २३ | नि.प्लॉट नं. २५ | ६.२० मीटर रस्ता | नि.प्लॉट नं. २७ |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. ०२/०२/२०२६ अहिल्यानगर.

ॲडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख
कुरेशी फैजान फारुक

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. नमूद मिळकतीच्या मा. नगर भुमापन कार्यालय यांच्या प्रशासकीय दप्तरी विद्यमान मालक यांच्या नावाची नोंद झालेली आहे. नमूद मिळकतीची विक्री करण्याची बोली विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलाबरोबर केलेली आहे त्याद्वारे नमूद मिळकत कायमखुष खरेदीकामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की नमूद मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास अगर विद्यमान मालक यांनी नमुद मिळकतीबाबत पुरक कायदेशिर दस्तान्वये कधीही कोणत्याही स्वरुपाने मोबदला स्विकारला असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **०७ दिवसांचे आत** खालील दिलेल्या पत्यावर **संपुर्ण प्रशासकीय व न्यायिक कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे.** यथायोग्य कागदोपत्री पुराव्याशिवाय आलेल्या व कोणत्याही न्यायिक कागदोपत्री पुराव्याशिवाय प्रस्तुत जाहिर नोटीसीस केवळ वर्तमान पत्रातून घेतलेल्या कोणत्याही हरकती ग्राहय धरता येणार नाही. विहित **०७ दिवस मुदतीत कोणाचीही कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल विद्यमान मालक यांच्या समवेत कायदेशिरपणे व्यवहार पूर्ण करतील** तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

### परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील आणि नगर भुमापन कार्यालय, अहिल्यानगर-१ यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे शहरनगर येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.


| नगर भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ आर.चौ.मी. |
|---|---|
| ३५५४/१ | ४५.०० |
| विद्यमान मालक यांच्या कायदेशीर मालकीहक्काची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची नमूद संपूर्ण मिळकत. | |
| यांसी चतु:सिमा - महसुल व प्रशासकीय रेकॉर्डप्रमाणे व असलेल्या प्रत्यक्ष परिस्थितीप्रमाणे. | |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखुन न ठेविता.

**मिळकतीचे विद्यमान मालक** - १. राजेश लुनकरण मुनोत २. मंगल सुभाष सराफ ३. राजश्री शैलेंद्र जैन, सर्व रा. २५४६, जुनी घासगल्ली, शहाजीरोड, अहिल्यानगर.

**ॲड. संदिपकुमार दादासाहेब पाखरे**
(बी.ए.एल.एल.बी.) नोटरी पब्लिक भारत सरकार
**ॲड. सौ. श्रुती संदिपकुमार पाखरे**
(बी.ए.एल.एल.बी.)
पत्ता : ६२७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मीदीप निवास, बालिकाश्रम हायस्कूल जवळ, अहिल्यानगर मो. ९८५०१८१७१७

अहिल्यानगर
दि.०२/०२/२०२६



डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

- डोकेदुखी, मायग्रेन
- फिटचे आजार, अपस्मार
- हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
- तोल जाणे
- व्हर्टिगो, चक्कर येणे
- अर्धांगवायू, पॅरेलीसीस
- विसराळूपणा
- थरथर सुटणे, पार्किन्सन

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध. * सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कास्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
9257575718
9764416136


# -: सहकार पणन व वस्रोद्योग विभाग :-

**मे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या. अ.नगर महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.**

## - जाहीर समन्स -

**डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,** संत आण्णा चर्च, कलेक्टर कचेरीजवळ, अहिल्यानगर ता/जि-अहिल्यानगर या संस्थेने त्यांचे कर्जदार / जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०९ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक १५/०७/२०२५ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक १८/११/२०२५ व दिनांक १०/१२/२०२५ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दिनांक १०/१२/२०२५ व दिनांक २३/१२/२०२५ रोजी ठेवण्यात आलेली होती सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक १०/०२/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अनगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा न.४, पहिला मजला, **GS** महानगर बँके शेजारी, अहिल्यानगर, यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी

| अ.नं. | दावा क्रमांक | कर्जदार/जामिनदाराचे नाव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १) | १८० २०२५ | जाबदेणार १) श्री मोरे रमेश दिनकर<br>राहणार :- प्लॉट नं.०४. बालाजी रेसीडेन्सी- **F** विंग, सारसनगर, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री घोरपडे हेमराज दिनकर<br>राहणार :- ०६ आंबेकर कॉलनी, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-निकाळे बबन रामभाऊ<br>राहणार :- ताराबाग हौ.सो. पुणे रोड, केडगाव, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ-मोरे वर्षा रमेश<br>राहणार प्लॉट नं. ०४, बालाजी रेसीडेन्सी, **F**-विंग, सारसनगर, अहिल्यानगर | ५८,५९७/- |
| २) | १८१ २०२५ | जाबदेणार १) श्री-पुंड रमेश शंकर<br>राहणार - सन.२८५/१०/१, सुडकेमळा, गणपती मंदिराजवळ, बालिकाश्रम रोड, सावेडी अ.नगर<br>जाबदेणार २) श्री-भोसले मनोज दगडु<br>राहणार :- घर नं. ३२, वैष्णवीमाता, मंदिराजवळ, पद्मानगर, पा. लाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-देशमुख अभय अरुण<br>राहणार :- घर नं. ३. संत ज्ञानेश्वर हौसिंग सोसायटी, रूपमातानगर, बोल्हेगाव ता/जि-अहिल्यानगर,<br>जाबदेणार ४) श्रीमती- पुंड सोनल रमेश<br>राहणार :- सन.२८५/१०/१. सुडकेमळा, गणपती मंदिराजवळ, बालिकाश्रम रोड, सावेडी. अ.नगर | २०,७१,२८२/- |
| ३) | १८६ २०२५ | जाबदेणार १) श्री शिंपुर्डे विशाल दत्तात्रय<br>राहणार :- प्लॉट नं. ११२ मोहिनीनगर, नवनागपूर, बिलीवर्स चर्चजवळ, वडगाव गुप्ता. ता/जि-अ.नगर.<br>जाबदेणार २) श्री-साठे संतोष रोहिदास<br>राहणार :- मुन्सिपल कॉलनी, बागरोजा हडको, नालेगाव, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-शिंदे अमोल अशोक<br>राहणार : वाळुंज गावठाण, बाबुर्डी घुमट, सोलापूर रोड, ता/जि-अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्रीमती- झिंपुर्डे मंगल दत्तात्रय<br>राहणार :- घन. १४८, कुलटमळा, वाळकी रोड, बुरूडगाव. ता/जि-अ.नगर | ४२,६४,३६६/- |
| ४) | १८८ २०२५ | जाबदेणार) श्री-पाचारणे कैलास देवराम<br>राहणार - सन. ५१ पाचारणेमळा, **VRDE** जवळ, बुरूडगाव. ता/जि. अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री-कांबळे राहुल तुळशीदास,<br>राहणार- घर नं. २४९ अ, कांबळेमळा, केडगाव.ता/जि. अहिल्पानगर<br>जाबदेणार ३) श्री-सोनवणे गणपत फकीरा<br>राहणार:- बॉस्को ग्रा. विकास केंद्राजवळ, पुणे रोड, केडगाव. ता.जि. अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्री-पाचारणे देवराम तात्याबा<br>राहणार - सन. ५१ पाचारणेमळा, **VRDE** जवळ, बुरूडगाव. ता/जि. अहिल्यानगर | ७,९७,५८५८/- |
| ५) | १८९ २०२५ | जाबदेणार १) श्री-शिरवाळे विनोद सहादू<br>राहणार:- सन. ८०/१/२, घर नं १००, शंभू चौक, लोकसेवा तालीमसमोर, मनोलीलानगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) सौ-कुचे स्वाती सुरेशराव.<br>राहणार:- प्लॉट ११, रिया आकांक्षा रेसिडेन्सी, एस्सार पेट्रोल पम्पामागे, बालिकाश्रम रोड, फुलारी मळा, सावेडी अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-पाटोळे शिवाजी योसेफ,<br>रहिवासी :- **C/O** शेख युसूफ मुनवर घर क्रमांक ५०, संत तुकाराम सोसायटी, बोल्हेगाव, ता/जि.अ.नगर<br>जाबदेणार ४) सौ- शिरवाळे सोनिया विनोद<br>राहणार :- सन.८०/१/२, घर नं.१००, शंभू चौक, लोकसेवा तालीमसमोर, मनोलीलानगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर | १,५२,७६७/- |
| ६) | १९० २०२५ | जाबदेणार १) श्री-गायकवाड भास्कर हंसराज<br>राहणार : पोलीस वसाहत, ब्लॉक नं. २४, रूम न.३३३. सर्जेपुरा, अ.नगर<br>जाबदेणार २) श्री-कांबळे भीमा अशोक<br>राहणार :- पोलीस लाईन, ब्लॉक न.०३, रूम न.३४. भिंगार, अहिल्यानगर,<br>जाबदेणार ३) श्री-खंडागळे धिरज रमेश<br>राहणार:- पोलीस वसाहत, ब्लॉक न.२४, रूम न ३३३, सर्जेपुरा, अ.नगर<br>जाबदेणार ४) सौ-गायकवाड रागिणी हंसराज<br>राहणार : पोलीस वसाहत, ब्लॉक नं.२४, रूम न. ३३३, सर्जेपुरा, अ.नगर | ६३,९७९/- |
| ७) | १९१ २०२५ | जाबदेणार १) श्री-सय्यद समीर उस्मान<br>राहणार :- फ्लॅट न.४९, रेणुकानगर, श्रीकृष्ण मंदिराजवळ, बोल्हेगाव.<br>जाबदेणार २)श्री-मोरे विजय गौतम<br>राहणार -**C/0**. शिंदे ताराचंद सदाशिव. फ्लॅटन. १३/१४, आरडे इलेक्ट्रिकल्स, बुरुडगावरोड, अ. नगर.<br>जाबदेणार ३) श्री-शेख इम्रान इक्बाल<br>राहणार : घन. २७९४, साईनगर, आलमगीर, नागरदेवळे, अ.नगर<br>जाबदेणार ४) सौ-सय्यद शमीम समीर<br>राहणार :- फ्लॅट न.४९ रेणुकानगर, श्रीकृष्ण मंदिराजवळ, बोल्हेगाव | १,५३,८६१/- |
| ८) | १९२ २०२५ | जाबदेणार १) सौ-कानडे बेबी राजेंद्र<br>राहणार :- **DP** शेजारी मराठीशाळेजवळ, मेहकरी, ता/जि-अहिल्यानगर,<br>जाबदेणार २) श्री-कानडे भीमा मारुती.<br>राहणार :- पाण्याच्या टाकीजवळ, पाथर्डी रोड, मेहकरी, ता/जि-अहिल्यानगर,<br>जाबदेणार ३) श्री-साळवे नितिन विष्णू<br>राहणार:-धन. २६१. रूम न.३९, समता कॉ. विनयचाळ, अ.नगर<br>जाबदेणार ४) श्री-कानडे राजेंद्र उत्तम<br>राहणार :- **DP** शेजारी, मराठी शाळेजवळ, मेहकरी, ता/जि-अहिल्यानगर | १,०६,५०५/- |
| ९) | १९३ २०२५ | जाबदेणार १) श्री-पाटोळे विशाल मानवेल<br>राहणार :- मु. इमामपूर, हरिजन वस्ती, चर्चजवळ. पो. जेऊर, ता/जि-अ.नगर.<br>जाबदेणार २)श्री-जरे विनोद पोपट<br>राहणार :- मु.इमामपूर ग्रामपंचायत कार्या. जवळ. पो. जेऊर, ता/जि-अ.नगर.<br>जाबदेणार ३) श्री-पाटोळे अमोल रवींद्रकुमार<br>राहणार :- पाटोळे वस्ती, इमामपूर. पो. जेऊर.ता/जि-अ.नगर<br>जाबदेणार ४) सौ-पाटोळे मंदाबाई मानवेल.<br>राहणार :- मु. इमामपूर, हरिजनवस्ती, चर्चजवळ. पो. जेऊर.ता/जि-अ.नगर. | ८०,१०७/- |
| १०) | १९४ २०२५ | जाबदेणार १) श्रीमती-वाडसरिया संगीता राधाकिसन.<br>राहणार :- **C/O** -साळवे कमल हडको कॉ मुनोत साडी सेंटर, जवळ, सावेडी, अहिल्यानगर,<br>जाबदेनार २) श्री-सय्यद सादिक गफूर<br>राहणार :- **C/O**-शेख खुदाबक्ष, प्लॉट नं. ई६६, यशवंतनगर, फकीरवाडा, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-गायकवाड सोमनाथ आनंदराव<br>राहणार : माधव रो.हौ.सोसा. विठ्ठल मंदिरासमोर, शाहूनगर, केडगाव. ता/जि-अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्रीमती- राणा प्राजक्ता किरण<br>राहणार - **C/O**-साळवे कमल हडको कॉ. मुनोत साडी सेंटर, जवळ, सावेडी, अहिल्यानगर | १,१३,०५०/- |
| ११) | १९५ २०२५ | जाबदेणार १) श्री-भाले परमेश्वर तुकाराम<br>राहणार -C/0-कावरे सुनील सन.A/२/३ घ.न. ०८, साईसोना, अपार्ट मार्केटयार्डमागे, सारसनगर, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री-शिर्के शैलेश बाळकृष्ण<br>राहणार :- C/0-बोरुडे म्हसू नामदेव ढोरवस्ती, रामकृष्ण शाळेजवळ, बुरुडगाव रोड, अ.नगर<br>जाबदेणार ३) श्री-गोपाळ विष्णु नारायण<br>राहणार :- ढोरवस्ती, रामकृष्ण शाळेजवळ, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ-वाघमारे पुनम भागवत (भाले)<br>राहणार:-C/0-कावरे सुनील सन.A/२/३ घन.०८, साईसोना, अपार्ट, मार्केटयार्डमागे, सारसनगर, अहिल्यानगर | १,६६,५५२/- |
| १२) | १९७ २०२५ | जाबदेणार १) श्री-खान मंजूर अली साजाहरअली<br>राहणार :- सन.६७/१, प्लॉट न.१४, सनफार्माजवळ, म्हस्के रोड, बोल्हेगाव, ता/जि-अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री रंगरेज सय्यद मोहम्मद हाशिम अब्दुल लतिफ<br>राहणार :- इमारत नं.४७, गाळा न.२५६, हडको कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-मोरे भाऊसाहेब नामदेव<br>राहणार :-७१/४४६ गणेश चौक, मस्जिदसमोर सिविल हडको, अ. नगर<br>जाबदेनार ४) सौ-खान फातेमा मंजूरअली<br>राहणार :- सन.६७/१, प्लॉट न.१४, सनफार्माजवळ, म्हस्के रोड, बोल्हेगाव, ता/जि-अहिल्यानगर | १,०६,३६२/- |
| १३) | १९८ २०२५ | जाबदेणार १) श्री-कानडे रविंद्र बाळासाहेब<br>राहणार:- मेहकरी ता/जि-अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री-कांबळे भिमा अशोक<br>राहणार:- टाकळी काझी. ता/जि-अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-कानडे बाळू पिरता<br>राहणार :- मेहकरी, ता/जि-अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ-कानडे स्मिता रविंद्र<br>राहणार :- मेहकरी, ता/जि-अहिल्यानगर | २,६७,१९८/- |
| १४) | १९९ २०२५ | जाबदेणार १) श्री-पाटोळे कोमल दिपक<br>राहणार :- कोंबडीवालामळा, फऱ्याबाग, मुक्तीफौज शाळेजवळ, केदारवस्ती, सोलापूर रोड, अहिल्यानगर.ता/जि-अ.नगर.<br>जाबदेणार २) श्री-मिसाळ प्रदिप साहेबराव<br>राहणार:- घन. ३७०, एकलव्य हौ. सोसा. बाणेश्वर मंगलकार्यालयाजवळ, बुऱ्हाणनगर, ता/जि-अ.नगर.<br>जाबदेणार ३) श्री-साळवे व्हिक्टर शांतवन<br>राहणार :- केदारवस्ती, सोलापूर रोड, अहिल्यानगर ता/जि-अ.नगर<br>जाबदेणार ४) श्री-पाटोळे दिपक गोरख<br>राहणार :- कोंबडीवालामळा, फऱ्याबाग, मुक्तीफौज शाळेजवळ, केदारवस्ती, सोलापूर रोड, अहिल्यानगर. ता/जि-अ.नगर | १,४७,०६५/- |
| १५) | २०० २०२५ | जाबदेणार १) श्री-साळवे बापू चंद्रभान<br>राहणार :- c/o - वैरागर बबन चंदर घन.२६, कँन्टोन्मेंट चाळ, भिंगार, अ.नगर<br>जाबदेणार २) श्रीमती-भोसले आशा काशिनाथ<br>राहणार :- घन, २२, कैन्टोन्मेंट चाळ, भिंगार, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री-साळवे शशिकांत प्रभाकर<br>राहणार :- नगर-पाथर्डी रोड, वडारवाडी डेअरीफार्म, भिंगारनाका, भिंगार, अ.नगर<br>जाबदेणार ४) सौ-गायकवाड रागिणी हंसराज<br>राहणार :- c/o - वैरागर बबन चंदर धन. २६ कँन्टोन्मेंट चाळ, भिंगार, अ.नगर | ६२,४२१/- |
| १६) | २०२ २०२५ | जाबदेणार १) श्री-आखाडे विनोद शंकर<br>राहणार :- C/0-रायकर प्रशांत. सन. २५६/२, प्लॉट नं.१९.रो.हौं.नं.०४, जयमंगल नगरी, डॉनबॉस्को कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री-तडवी असलम जमशेर<br>राहणार सन. ७५/३. प्लॉट न. ४३, नवनाथ मंदिराजवळ, बोल्हेगाव, अ.नगर<br>जाबदेणार ३) श्री गिरी संजय विनायक<br>राहणार :- C/0 -पवार प्रदीप. राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव फाटा, नागापूर, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ-आखाडे कोमल विनायक<br>राहणार : C/0 -रायकर प्रशांत. सन.२५६/२. प्लॉट न.१९.रो.हौ.नं.०४, जयमंगल नागरी, डॉनबॉस्को कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर | ६०,८९४/ |
| १७) | २०३ २०२५ | जाबदेणार १) श्री-हिरणवळे आनंद राम<br>राहणार:- घन.२८. सारसनगर, वीटभट्टीजवळ, अ.नगर<br>जाबदेणार २)श्री-पटेल गणी अब्दुल<br>राहणार :- अलउस्मानी पार्क, पंढरीचामळा, जखणगाव, ता/जि-अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री नवगिरे भागचंद सुधीर<br>राहणार:- गायकवाड चाळ, स्टेशन रोड, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ-हिरणवाळे सुवर्णा आनंद<br>राहणार : घ.नं. २८, सारसनगर, वीटभट्टीजवळ, अ.नगर | १,१५,९९५/- |
| १८) | २०४ २०२५ | जाबदेणार १) सौ-घोडके रोजमेरी चंद्रकांत<br>राहणार :- क्वार्टर न.RB१/३३/B. रेल्वे क्वार्टर, रेल्वेस्टेशन, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री-शिंदे संजय रोहिदास<br>राहणार :- सन.२२/१.प्लॉ.नं. ३७/११,रभाजीनगर, पोतदारशाळेजवळ, केडगाव<br>जाबदेणार ३) श्री-धिंवर अविनाश भागवत<br>राहणार:- प्लॉट न.१७, फोर्जिंग कॉलनी, वडगाव गुप्ता. ता-अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ-घोडके चंद्रकांत जॉन<br>राहणार :- कार्टर नं.RB१/३३/B, रेल्वे क्वार्टर, रेल्वेस्टेशन, अहिल्यानगर | १,०९,७५७/- |

ठिकाण : अहिल्यानगर
दिनांक २१/०१/२०२६

**(बाळकृष्ण शिंदे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अ.नगर

# अर्थजगत

## करसवलतीसाठी सहकर्जदार नव्हे सहमालक बना!

गृहकर्जाच्या माध्यमातून घर खरेदी करणे आता केवळ सोपे झाले नसून, प्राप्तिकर अधिनियम १९६१ अंतर्गत त्यातून मोठे कर लाभही मिळवता येतात. मात्र, हे लाभ पदरात पाडून घेताना अनेक करदात्यांमध्ये संभ्रम असतो. विशेषतः सह-कर्जदार असलेल्या व्यक्तींना सर्व सवलती मिळतातच असे नाही. या सवलतींसाठी संबंधित व्यक्ती मालमत्तेची सह-मालक असणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे.

**व्याजावरील सवलतीचे गणित**

स्वतः राहण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घरासाठी घेतलेल्या कर्जावर वार्षिक २ लाख रुपयांपर्यंतच्या व्याजावर कर सवलत मिळते. मात्र, ही सवलत मिळवण्यासाठी काही अटी आहेत:

**कर्जाचा उद्देश:** कर्ज केवळ घर खरेदी किंवा बांधकामासाठी घेतलेले असावे. जर ते घराच्या दुरुस्तीसाठी असेल, तर ही सवलत केवळ ३०,००० रुपयांपर्यंत मर्यादित राहते.

**ताब्याची मुदत:** घराचे बांधकाम ठरलेल्या मुदतीत पूर्ण होणे आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, व्याजावरील सवलतीचा दावा घर ताब्यात मिळाल्यापासूनच करता येतो, कर्ज मंजूर झाल्यापासून किंवा 'ईएमआई' सुरू झाल्यापासून नाही.

**अर्थनियम**

**भाड्याचे घर:** जर घर भाड्याने दिले असेल, तर संपूर्ण व्याजावर वजावट मिळते, परंतु इतर उत्पन्नातून होणारी वजावट वार्षिक २ लाख रुपयांपेक्षा जास्त असू शकत नाही. उर्वरित रक्कम पुढील वर्षाच्या दाव्यात समाविष्ट करता येते.



**मुद्दल आणि इतर खर्चांवरील वजावट**

कलम '८० सी' अंतर्गत गृहकर्जाच्या मुद्दल परतफेडीवर वार्षिक १.५ लाख रुपयांपर्यंत वजावट मिळते. परंतु, या १.५ लाखांच्या मर्यादेत 'ईपीएफ', 'एलआयसी' प्रीमियम आणि 'ईएलएसएस' सारख्या इतर गुंतवणुकींचाही समावेश असतो. मालमत्तेची नोंदणी करताना दिलेले मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क यावरही त्याच वर्षी सवलत घेता येते. जर मालमत्ता ताब्यात मिळाल्यानंतर पाच वर्षांच्या आत विकली, तर मुद्दलावर घेतलेले सर्व कर लाभ रद्द होतात आणि ती रक्कम करदात्याच्या उत्पन्नात धरली जाते.

**सह-मालकांसाठी विशेष नियम**

तज्ज्ञांच्या मते, केवळ सह-कर्जदार असल्याने कर सवलत मिळत नाही. सवलतीचा दावा करण्यासाठी खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे: १. व्यक्ती मालमत्तेची सह-मालक असावी. २. संबंधित व्यक्ती 'ईएमआई' भरण्यात प्रत्यक्ष योगदान देत असावी. ३. कपातीचा फायदा हा मालमत्तेतील मालकी हक्क आणि 'ईएमआई'मधील योगदानाच्या प्रमाणातच मिळतो. उदाहरणार्थ, जर दोन मालकांचा हिस्सा ५०-५० टक्के असेल, तर दोघेही व्याजाच्या अर्ध्या रकमेवर सवलत घेऊ शकतात.

**नवीन कर व्यवस्था**

नवीन कर व्यवस्थेचा स्वीकार करणाऱ्या करदात्यांना गृहकर्जावरील बहुतेक सवलती मिळत नाहीत. स्वतः वापरत असलेल्या घरासाठी मुद्दल किंवा व्याजावर कोणतीही सूट मिळत नाही. मात्र, भाड्याने दिलेल्या मालमत्तेच्या व्याजावर वजावट घेता येते, ज्याची गणना 'हाऊस प्रॉपर्टी' मधून मिळणारे उत्पन्न म्हणून केली जाते. ◆◆◆

स्वप्नातील घर घेण्यासाठी जेव्हा तुम्ही बँकांच्या व्याजाची तुलना करता, तेव्हा केवळ 'हेडलाईन रेट' (दर्शनी व्याजदर) पाहून भुलू नका. अनेकदा कमी व्याजदराचे आमिष दाखवून बँका कर्ज करारात अशा काही अटी आणि शुल्कांचा समावेश करतात, ज्यामुळे तुमच्या खिशाला लाखो रुपयांची कात्री लागू शकते. केवळ व्याजदर न पाहता करारातील बारीक अक्षरातील अटी वाचा, असा सल्ला आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञ देतात.

## खिशावर भार टाकणाऱ्या कर्जअटी

**१. प्रोसेसिंग आणि प्रशासकीय शुल्क :** कर्ज अर्जाची छाननी करण्यासाठी बँका ०.२५% ते १% पर्यंत प्रोसेसिंग फी आकारतात. काही बँका 'झिरो प्रोसेसिंग फी'ची जाहिरात करतात, पण त्यानंतर 'प्रशासकीय शुल्क' म्हणून मोठी रक्कम वसूल केली जाते. ही फी ५,००० ते २५,००० रुपयांपर्यंत असू शकते, जी परत मिळत नाही.

**२. एमओडीटी शुल्क :** 'मेमोरँडम ऑफ डिपॉझिट ऑफ टायटल डीड' म्हणजे तुमचे घराचे कागदपत्र बँकेकडे गहाण ठेवल्याचा पुरावा. यासाठी मुद्रांक शुल्क भरावे लागते, जे कर्जाच्या रकमेच्या ०.१% ते ०.५% असू शकते. ५० लाखांच्या कर्जावर हे शुल्क २५,००० रुपयांपर्यंत जाऊ शकते, ज्याचा विचार ग्राहक सहसा करत नाहीत.




**३. तांत्रिक आणि कायदेशीर पडताळणी शुल्क :** बँक मालमत्तेची कायदेशीर कागदपत्रे तपासण्यासाठी वकील आणि मालमत्तेचे मूल्य ठरवण्यासाठी इंजिनिअरची नेमणूक करते. याचे शुल्क ५,००० ते १५,००० रुपयांपर्यंत असते. जर प्रकल्प बँकेने आधीच मंजूर केला नसेल, तर हे शुल्क ग्राहकालाच सोसावे लागते.

**४. कर्ज परिवर्तन शुल्क :** जेव्हा बाजारात व्याजदर कमी होतात, तेव्हा जुन्या ग्राहकांना त्या कमी दराचा फायदा घेण्यासाठी बँका 'कन्व्हर्जन फी' आकारतात. हे शुल्क थकीत मुद्दलाच्या ०.२५% ते ०.५% असू शकते. ४० लाखांच्या कर्जावर १०,००० ते २०,००० रुपये फक्त दर बदलण्यासाठी मोजावे लागतात.

**५. मुदतपूर्व परतफेड दंड :** रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार, 'फ्लोटिंग' व्याजदराच्या कर्जावर कोणताही दंड आकारता येत नाही. मात्र, जर तुमचे कर्ज 'फिक्स्ड' दराचे असेल, तर मुदतीआधी कर्ज फेडल्यास बँक २% ते ४% दंड आकारू शकते.

**६. विलंब शुल्क आणि धनादेश परतावा :** एकही हप्ता चुकला तर बँक दरमहा २% पर्यंत दंड आकारते. याशिवाय, ईसीएस किंवा धनादेश परत आल्यास ५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त भुर्दंड बसतो. हे शुल्क तुमच्या सिबिल स्कोअरवरही परिणाम करते.


**७. दस्तऐवज पुनर्प्राप्ती शुल्क :** कर्ज पूर्ण फिटल्यानंतर बँकेकडून मूळ कागदपत्रे परत घेण्यासाठी किंवा अर्ध्यावर कर्ज बंद केल्यास दस्तऐवज काढण्यासाठी ५०० ते ५,००० रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाते.करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी या मुद्द्यांवर बँकेशी स्पष्ट चर्चा करणे हिताचे ठरते. गृहकर्ज घेताना केवळ व्याजाचा दर न पाहता 'वार्षिक टक्केवारी दर' (एपीआर) तपासावा, ज्यामध्ये या सर्व शुल्कांचा समावेश असतो. ◆◆◆

## 'रिफंड'च्या फोनपासून सावध राहा!

तुमची एक जुनी विमा पॉलिसी असून तिची रक्कम आता कित्येक पटींनी वाढली आहे, असा फोन तुम्हाला कधी आला आहे का? असा फोन आल्यावर मनात आनंदाच्या लाटा उसळणे स्वाभाविक आहे, परंतु हाच आनंद तुमच्या बँक खात्यासाठी धोक्याची घंटा ठरू शकतो. सध्या जुन्या विमा पॉलिसीचा परतावा मिळवून देण्याच्या नावाखाली सर्वसामान्यांची मोठी फसवणूक केली जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

**फसवणुकीचे जाळे आणि कार्यपद्धती**

हे सायबर गुन्हेगार अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आपले जाळे विणतात. तुमच्याकडे एखादी जुनी पॉलिसी होती, जी तुम्ही विसरून गेला आहात, असे सांगून हे ठकसेन संभाषणाला सुरुवात करतात. विशेष म्हणजे, या ठगांकडे तुमचा डेटा आधीच उपलब्ध असतो. तुमचे पूर्ण नाव, कोणत्या कंपनीची पॉलिसी होती, प्रीमियम किती होता आणि ती कधी सुरू झाली होती, अशी सर्व माहिती ते आत्मविश्वासाने सांगतात. ही माहिती डेटा चोरीच्या माध्यमातून मिळवलेली असते, ज्यामुळे समोरची व्यक्ती खरीच कंपनीतून बोलते आहे, असा तुमचा ठाम विश्वास बसतो. या प्रक्रियेत 'घाई' हा सर्वात



मोठा हत्यार म्हणून वापरला जातो. परताव्याची मुदत आजच संपत आहे किंवा लवकर प्रक्रिया न केल्यास पैसे सरकारी तिजोरीत जमा होतील, असे सांगून ग्राहकाला विचार करण्यास वेळच दिला जात नाही. घाईघाईत घेतलेला निर्णय हा नेहमीच फसवणुकीकडे नेणारा असतो, हे येथे लक्षात घेणे गरजेचे आहे.

**सरकारी यंत्रणेचे नाव**

अनेकदा हे ठग 'विमा लोकपाल'चे प्रतिनिधी असल्याचे भासवतात. मात्र, वस्तुस्थिती अशी आहे की, कोणतीही विमा कंपनी किंवा सरकारी संस्था स्वतःहून फोन करून अशा प्रकारे अनक्लेम्ड पैशांची माहिती देत नाही. विमा लोकपालाचे मुख्य काम हे विमा कंपनी आणि ग्राहक यांच्यातील वाद सोडवणे हे आहे, आणि तेही तेव्हाच जेव्हा ग्राहक स्वतः त्यांच्याकडे तक्रार नोंदवतो. विमा लोकपाल कोणत्याही जुन्या पॉलिसीचा मागोवा घेत नाही किंवा परताव्याचे गणित मांडून ग्राहकांना फोन करत नाही.

कोणत्याही वैध विमा प्रक्रियेत जुन्या पॉलिसीचे पैसे मिळवण्यासाठी नवीन पॉलिसी खरेदी करण्याची अट नसते. जर समोरची व्यक्ती तुम्हाला रिफंड मिळवण्यासाठी नवीन विमा उतरवण्यास सांगत असेल किंवा 'प्रोसेसिंग फी'च्या नावाखाली आगाऊ पैशांची मागणी करत असेल, तर ती शंभर टक्के फसवणूक आहे. एकदा का तुम्ही पैसे ट्रान्सफर केले की, संबंधित व्यक्ती गायब होते आणि दिलेले आश्वासन कधीच पूर्ण होत नाही.

जुन्या किंवा बंद पडलेल्या पॉलिसीबाबतचे नियम स्पष्ट आहेत. जर तुमची पारंपरिक पॉलिसी सुरुवातीच्या काळातच बंद पडली असेल आणि तिची 'सरेंडर व्हॅल्यू' तयार झाली नसेल, तर भरलेला प्रीमियम जप्त होतो आणि कोणताही परतावा मिळत नाही. युनिट लिंक्ड प्लॅनमध्ये ही रक्कम एका ठराविक काळानंतर काढता येते, परंतु त्यातही कोणतेही अवास्तव परतावे मिळत नाहीत. कोणताही छोटा प्रीमियम अचानक मोठ्या रकमेत रूपांतरित होत नाही, हे वास्तव ग्राहकांनी समजून घेणे आवश्यक आहे. ◆◆◆

## गुंतवणुकीचा '१०-५-३' नियम

गुंतवणूक करताना किती परतावा मिळेल, यावरच अनेकदा सर्व गणिते अवलंबून असतात. मात्र, भारतीय बाजारपेठेत गुंतवणुकीचे वास्तव समजून घेण्यासाठी '१०-५-३' हा नियम अत्यंत प्रभावी ठरत आहे. हा नियम केवळ परताव्याची अपेक्षा निश्चित करत नाही, तर महागाई आणि कराचा विचार करून नेमकी कुठे गुंतवणूक करावी, याचे दिशादर्शन करतो.



हा नियम भारतीय गुंतवणूकदारांना वास्तववादी परताव्याचा अंदाज देतो.

**१० टक्के :** इक्विटी म्युच्युअल फंड आणि शेअर्सकडून अपेक्षित परतावा.

**५ टक्के:** डेट साधने जसे की ईपीएफ, पीपीएफ आणि डेट फंड्स.

**३ टक्के:** बचत खाते आणि मुदत ठेवी.

**१. इक्विटी म्युच्युअल फंड: १० टक्के वाढीचे इंजिन :** लाँग-टर्म वेल्थ क्रिएशनसाठी इक्विटी म्युच्युअल फंड (लार्ज-कॅप, फ्लेक्सी-कॅप, इंडेक्स फंड) हे सर्वोत्तम मानले जातात. जरी बाजारात चढ-उतार असले, तरी १० ते २० वर्षांच्या कालावधीत भारतीय इक्विटीने ऐतिहासिकदृष्ट्या १० ते १२ टक्के 'सीएजीआर' परतावा दिला आहे. निवृत्ती आणि मुलांचे शिक्षण यांसारख्या दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी हा सर्वात चांगला पर्याय आहे.

**२. ईपीएफ आणि डेट फंड : ५ टक्के स्थिरतेचा स्तर :** 'ईपीएफ', 'पीपीएफ' किंवा 'एनपीएस'मधील 'डेट' हिस्सा तुमच्या पोर्टफोलिओला स्थिरता देतो. जेव्हा शेअर बाजार कोसळतो, तेव्हा हे पर्याय तुमच्या भांडवलाचे रक्षण करतात. मध्यम मुदतीच्या ध्येयांसाठी आणि खात्रीशीर परताव्यासाठी याकडे पाहिले जाते.

**३. बचत खाते आणि एफडी : ३ टक्के सुरक्षितता :** बचत खाते आणि एफडी हे संपत्ती निर्मितीसाठी नसून केवळ तरलतेसाठी आहेत. महागाई आणि कर वजा जाता, यातून मिळणारा खरा परतावा अत्यंत कमी असतो. त्यामुळे केवळ आणीबाणीचा निधी आणि अत्यंत अल्पकालीन गरजांसाठीच याचा वापर करावा.

**इन्व्हेस्टमेंट**

**एसआयपीच्या उदाहरणातून समजून घ्या:**

तुम्ही १५ वर्षांसाठी दरमहा १०,००० रुपयांची 'एसआयपी' सुरू केली, तर मिळणारी अंदाजित रक्कम:

इक्विटी म्युच्युअल फंड (१०%): ३८.६ लाख रुपये

डेट साधने (५%): २५.८ लाख रुपये

मुदत ठेव - एफडी (३%): २२ लाख रुपये

**स्मार्ट पोर्टफोलिओ कसा असावा?**

एक यशस्वी गुंतवणूकदार तोच असतो जो तिन्ही स्तरांचा समतोल राखतो. निवृत्तीसाठी 'ईपीएफ', वाढीसाठी 'म्युच्युअल फंड' आणि आणीबाणीसाठी 'एफडी' यांचा मेळ घालणे हे '१०-५-३' फ्रेमवर्कनुसार आदर्श ठरते. लक्षात ठेवा, परतावा दरवर्षी बदलू शकतो, त्यामुळे वर्षातून एकदा आपल्या गुंतवणुकीचा आढावा घेणे (रिबॅलन्सिंग) गरजेचे आहे. ◆◆◆

## 'गुगल पे'वरून मिळणार वैयक्तिक कर्ज

डिजिटल पेमेंटच्या युगात आता कर्ज घेण्याची प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ झाली आहे. 'एसएमएफजी इंडिया क्रेडिट' या नामवंत बिगर-बँकिंग वित्तीय संस्थेने (एनबीएफसी) 'गूगल पे' सोबत महत्त्वाची भागीदारी केली आहे. या करारानुसार, 'गूगल पे' वापरकर्त्यांना आता कोणत्याही तारणाशिवाय (कोलेटरल) वैयक्तिक कर्ज उपलब्ध होणार आहे.




देशातील कोट्यवधी नागरिकांपर्यंत औपचारिक कर्जपुरवठा सोप्या पद्धतीने पोहोचवणे, हा या भागीदारीचा मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे, ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल असून, कर्ज मंजूर झाल्यानंतर काही मिनिटांतच रक्कम थेट ग्राहकाच्या बँक खात्यात जमा होणार आहे. यामुळे ग्राहकांना आता बँकेच्या चकरा मारण्याची किंवा कागदपत्रांच्या जंजाळात अडकण्याची गरज उरणार नाही.

'एसएमएफजी इंडिया क्रेडिट'च्या मते, या सुविधेचा सर्वाधिक फायदा अशा लोकांना होईल ज्यांना बँकांकडून कर्ज मिळवण्यात अडचणी येत होत्या. दुर्गम भागातील किंवा उदयोन्मुख वर्गातील नागरिकांपर्यंत याद्वारे थेट पोहोचता येईल. कंपनीचे मुख्य व्यवसाय अधिकारी अजय पारेख यांच्या मते, तंत्रज्ञान आणि 'फिनटेक' प्लॅटफॉर्मच्या मदतीने आम्ही डिजिटल कर्ज पुरवठ्यात आमचे नेतृत्व सिद्ध करत आहोत. हे पाऊल देशाच्या समावेशी अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टाला पूरक ठरेल.

जपानच्या 'सुमितोमो मित्सुई फायनान्शिअल ग्रुप'ची पूर्ण मालकी असलेली ही कंपनी २००७ पासून भारतात कार्यरत आहे. रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत असलेल्या या संस्थेचे जाळे ६७० पेक्षा जास्त शहरे आणि ७० हजारांहून अधिक गावांमध्ये पसरलेले आहे. ही संस्था वैयक्तिक कर्जासोबतच गृहकर्ज, एसएमई फायनान्सिंग आणि वाहन कर्ज यांसारख्या विविध सुविधा पुरवते. ◆◆◆

## हक्काच्या रजा आणि तुम्ही

भारतातील श्रम आणि रोजगार क्षेत्रात ऐतिहासिक बदल घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने जुन्या कायद्यांचे एकत्रीकरण करून नवीन कामगार संहिता (लेबर कोड) आणली आहे. या नवीन नियमावलीत कर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले असून, त्यापैकी सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'रजा धोरण'. अनेकदा खासगी कंपन्यांमध्ये रजा घेतल्यामुळे कर्मचाऱ्याच्या कामगिरीवर (परफॉर्मन्स) नकारात्मक परिणाम दाखवला जातो किंवा त्याला पदोन्नती व वेतनवाढ नाकारली जाते. मात्र, नवीन कामगार संहिता २०२० (इंडस्ट्रियल रिलेशन्स कोड) नुसार आता कर्मचाऱ्याला त्याच्या हक्काच्या रजा वापरल्याबद्दल मालकाकडून कोणत्याही प्रकारची शिक्षा दिली जाऊ शकत नाही.




नवीन संहितेनुसार प्रत्येक कर्मचाऱ्याला मिळणाऱ्या हक्काच्या रजा (अर्नड् लिव्ह), किरकोळ रजा (कॅज्युअल लीव्ह) आणि आजारपणाच्या रजा (सिक लिव्ह) या केवळ सवलती नसून ते त्यांचे वैधानिक अधिकार आहेत. एखाद्या कर्मचाऱ्याने त्याच्या रजांच्या कोट्यात राहून सुट्ट्या घेतल्या असतील, तर त्या कारणावरून त्याला कामावरून काढणे किंवा त्याचा पगार कापणे हे पूर्णपणे बेकायदेशीर ठरते.

बऱ्याचदा खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये भीती असते की, जास्त रजा घेतल्यास वार्षिक वेतनवाढ (इन्क्रिमेंट) कमी मिळेल. पण कामगिरीच्या मूल्यमापनात (अप्रझल) केवळ रजा घेतली म्हणून कर्मचाऱ्याला कमी गुण देणे हे 'अनुचित कामगार प्रथा' (अनफेअर लेबर प्रॅक्टिस) मानले जाईल. कंपनीला आपले धोरण ठरवताना रजेच्या दिवसांना कामगिरीच्या निकषांमधून वेगळे ठेवावे लागेल.

कंपनीने वेतनवाढ ठरवताना उत्पादकता आणि कामाचा दर्जा यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. जर एखादा कर्मचारी रजेवर असताना त्याचे काम वेळेत पूर्ण होत असेल किंवा त्याच्या अनुपस्थितीचा कामावर गंभीर परिणाम होत नसेल, तर केवळ उपस्थितीच्या आकड्यावरून त्याला दंडित करणे चुकीचे आहे.

**विशेषतः** प्रसूती रजेच्या (मॅटर्निटी लीव्ह) बाबतीत कायदा अत्यंत कडक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा संदर्भ देत तज्ज्ञांनी सांगितले की, प्रसूती रजेमुळे कोणत्याही महिला कर्मचाऱ्याच्या कारकीर्दीवर किंवा वेतनावर कोणताही विपरीत परिणाम करणे हा गंभीर गुन्हा आहे. एखादा कर्मचारी दीर्घकालीन आजारपणामुळे (कंटिन्युड इल-हेल्थ) कामावर येऊ शकत नसेल, तर अशा परिस्थितीत मालक त्याला नोटीस देऊन नोकरीवरून कमी करू शकतो. मात्र, अशा प्रकारची समाप्ती ही 'ले-ऑफ' किंवा 'रिट्रेंचमेंट' (कपात) मानली जात नाही. त्यामुळे अशा कर्मचाऱ्याला कपात भरपाई मिळण्याचा अधिकार नसतो. परंतु, जर कर्मचाऱ्याला दिव्यांगत्व आले असेल, तर त्याला कामावरून काढण्यापूर्वी मालकाने त्याला दुसऱ्या एखाद्या पदावर सामावून घेण्याचा प्रयत्न करणे कायद्याने बंधनकारक आहे.

अनेकदा राजीनामा दिल्यानंतर कर्मचारी शिल्लक रजा वापरतात. अशा वेळी कंपनीने दिलेला राजीनामा परत घेणे किंवा कर्मचाऱ्याला 'टर्मिनेट' करणे हे कायदेशीरदृष्ट्या कठीण असते. तज्ज्ञांच्या मते, कर्मचारी आधीच कंपनी सोडून जात असल्याने मालक सामान्यतः अशा कठोर कारवाया टाळतात, जोपर्यंत कर्मचाऱ्याने काही गंभीर आर्थिक किंवा गोपनीयतेचे उल्लंघन केलेले नसेल. ◆◆◆

## अवतरले क्रांतिकारी पेट्रोल



पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री, हरदीप सिंग पुरी यांनी गोवा येथे होत असलेल्या इंडिया एनर्जी वीक २०२६ मध्ये जिओ-बीपी (रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बीपी यांच्या संयुक्त उद्योगाचा रिलायन्स बीपी मोबिलिटी लिमिटेड चा कार्यरत ब्रँड,) येथे क्रांतीकारी ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजीच्या पेट्रोलचे अनावरण केले. हे पेट्रोल इंजिनचे महत्त्वाचे भाग स्वच्छ करण्यासाठी, प्रभावी स्वच्छता क्षमता देण्यासाठी, इंजिनची कार्यक्षमता पूर्ववत करण्यासाठी आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी, तसेच नियमित पेट्रोलच्या तुलनेत वाहनचालकांना दरवर्षी १०० किमीपर्यंत जास्त अंतर पार करण्यास मदत करणारे आहे. हे सर्व कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय उपलब्ध आहे.

इंजिनच्या नाजूक भागांवर चिकटलेला मळ हे पेट्रोल स्वच्छ करते, ज्यामुळे इंजिनची कार्यक्षमता सुधारते आणि ते अधिक सहजतेने चालते. स्वच्छता उत्तम दर्जाची करते आणि नियमितपणे वापरल्यास, इंजिन अधिक काळ स्वच्छ आणि अधिक विश्वासार्ह राहण्यास मदत करते. हे पेट्रोल भारताच्या विकसित गतिशील इंधन मानकांशी सुसंगत आहे. देखभालीचा खर्च कमी होतो. ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजीच्या पेट्रोलवर चालणारी मोटरसायकल कोईम्बतूर टेस्ट ट्रॅकवर ४,००० किमी चालवण्यात आली आणि या सुधारणांमुळे दरवर्षी १०० किमी पर्यंत अधिक चालण्याचा लाभ होतो. हा विज्ञानाधारित अगदी स्पष्ट दिसणारा फरक आहे. ◆◆◆

## जाणून घ्या: मुलांची आर्थिक प्रगती खुंटवणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबाच्या सवयी

भारतातील मध्यमवर्गीय कुटुंबातील मुले मोठी झाल्यानंतर अनेकदा आर्थिक विवंचनेत का अडकतात? याचे उत्तर त्यांच्या पदवीत किंवा नोकरीत नसून, लहानपणी घरात लागलेल्या सवयींमध्ये दडलेले आहे. पालकांच्या काही विशिष्ट सवयींमुळे मुलांची आर्थिक समज विकसित होत नाही आणि ते आयुष्यभर पगारातून पगार अशा चक्रात अडकतात, असे एका ताज्या अभ्यासात समोर आले आहे.

**आर्थिक अडथळ्यांची ८ प्रमुख कारणे:**

**१. पैशांविषयी गोपनीयता:** भारतीय घरांमध्ये उत्पन्न, ईएमआय, बचत आणि टॅक्स या विषयांवर मुलांशी चर्चा करणे टाळले जाते. पालकांना वाटते की ते मुलांना सुरक्षित ठेवत आहेत, पण प्रत्यक्षात मुले पैशांचे नियोजन शिकण्यापासून वंचित राहतात.

**२. गुंतवणुकीपेक्षा खर्चाचे मॉडेल:** मुले घरात जेव्हा फक्त पगार – बिले – खर्च हेच चक्र पाहतात, तेव्हा त्यांना वाटते की पैसे फक्त खर्च करण्यासाठी असतात. एसआयपी, पीपीएफ किंवा इक्विटी गुंतवणुकीचे महत्त्व समोर न आल्याने संपत्ती




निर्मिती त्यांना जोखमीची वाटते.

**३. सुरक्षिततेपेक्षा प्रतिष्ठेला महत्त्व :** ऐपतीबाहेर जाऊन 'ईएमआय'वर कार घेणे, महागड्या वस्तू किंवा लग्नावर अफाट खर्च करणे, या सवयींमुळे मुलांना असे वाटते की आर्थिक स्थैर्यापेक्षा 'दिसणे' महत्त्वाचे आहे. यामुळे मालमत्ता निर्मिती मागे पडते.

**४. वाढीपेक्षा सुरक्षित नोकरीचा ध्यास :** केवळ सरकारी नोकरी किंवा ठराविक पगाराच्या नोकरीचा गौरव केल्यामुळे मुलांमधील उद्योजकता आणि नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची वृत्ती कमी होते. स्थिरतेच्या अतिव्यामोहमुळे उत्पन्नाच्या संधी मर्यादित होतात.

**५. नकारात्मक आर्थिक विचार :** पैशांच्या अभावामुळे सतत चिंता व्यक्त करणे किंवा आपल्याला हे परवडणार नाही असे वारंवार म्हणणे मुलांमध्ये भीती निर्माण करते. त्याऐवजी पर्यायी मार्ग किंवा नियोजनावर चर्चा केल्यास त्यांची भीती दूर होऊ शकते.

**६. कर्जाबाबत अपुरी माहिती:** गृहकर्ज, शैक्षणिक कर्ज किंवा क्रेडिट कार्ड हे मध्यमवर्गीय जीवनाचे भाग आहेत, पण त्यांचे व्याज आणि क्रेडिट स्कोअर यावर घरात संवाद होत नाही. यामुळे मुले स्वावलंबी झाल्यावर कर्जाच्या जाळ्यात सहज अडकतात.

**७. यशाची चुकीची व्याख्या:** यश म्हणजे केवळ मोठी कंपनी किंवा चांगले पद, अशी समजूत करून दिल्याने मुले आर्थिक स्वातंत्र्याकडे दुर्लक्ष करतात. मोठे पद असूनही योग्य सवयींअभावी अनेक तरुण आजही महिनाअखेरीस पैशांसाठी झगडताना दिसतात.

**८. दैनंदिन सवयींचा अभाव:** भविष्यातील आर्थिक स्वातंत्र्य हे प्रौढपणी नाही, तर बालपणीच्या छोट्या सवयींमधून सुरू होते. दीर्घकालीन नियोजन आणि प्रदर्शनापेक्षा मूल्याला महत्त्व देण्याच्या सवयी मुलांचे भविष्य बदलू शकतात. ◆◆◆



मैदानी खेळात यश मिळविणारे ब्ल्यू डायमंड अ‍ॅकॅडमीचे विद्यार्थी.

## 'ब्ल्यू डायमंड अ‍ॅकॅडमी'चे मैदानी खेळात यश

नगर– ज्ञानसंपदा इंग्लिश स्कूल आयोजित अ‍ॅथलेटीक इंटर स्कूल स्पर्धे मध्ये ब्ल्यू डायमंड अक्‍डमी वडगाव गुप्ता येथील १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. वयोगट १४ वर्ष व वयोगट १७ वर्ष अशा दोन वयोगटात स्पर्धा घेण्यात आली .

गोळा फेक, थाळी फेक, भालाफेक, लांब उडी अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत श्रावणी गोरख शेवाळे, ईश्वरी शिवनाथ डोंगरे, सोनाक्षी गोरक्षनाथ ढेपे, तनिष्का अनंत काळे, आफशा इम्रान खान, काव्या सुधाकर निकम, अयान जावेद शेख, सोहम संदीप शेवाळे, यश बाळासाहेब आंबेडकर, फजल जावेद शेख या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खेळात सहभाग घेऊन उत्तम खेळाचे प्रदर्शन केले.

सर्वच विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत खूप अशी मेडल्स मिळवून ब्ल्यू डायमंड अक्‍डमी च्या शिरपेचात मानाचा तुरा खोसला. १४ वर्ष वयोगटातील थाळी फेक स्पर्धेत सत्यम भाऊसाहेब शेळके याने तृतीय क्रमांक मिळवला. १७ वर्ष वयोगटात थाळीफेक स्पर्धेत मुलीमध्ये तनुजा जनार्दन झिने – प्रथम क्रमांक तर श्रुती गणेश शेळके हिने द्वितीय क्रमांक मिळवला .

गोळा फेक स्पर्धेत मुलीमधून तनुजा जनार्दन झिने हिने द्वितीय क्रमांक, तर अनामिका चंद्रकेश यादव हिने तृतीय क्रमांक मिळवला. लांब उडी स्पर्धेत तनुजा जनार्दन झिने हिने द्वितीय क्रमांक मिळवला. गोळा फेक स्पर्धेत मुलामध्ये श्रीराज सुरेश वाघ याने तृतीय क्रमांक मिळवला

थाळीफेक स्पर्धेत मुलामध्ये शिवराज किरण चव्हाण याने प्रथम क्रमांक तर अथर्व सचिन डोंगरे याने द्वितीय क्रमांक मिळवला. भालाफेक स्पर्धेत मुलामध्ये शिवम संतोष अकोलकर याने तृतीय क्रमांक मिळवला. विजयी विद्यार्थ्यांना सुवर्ण, रजत आणि कांस्य पदक मिळवून त्यांचा सन्मान करण्यात आला.

खेळातील विशेष कामगिरीसाठी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षिका कांचन बोऱ्हाडे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजयी विद्यार्थ्यांना ब्ल्यू डायमंड अक्‍डमीचे प्राचार्य सुजित डोंगरे व उपप्राचार्या शारदा शेळके यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# पारनेरच्या पुरातन मूर्तीही ट्रस्टचीच 'न्यास मालमत्ता'; अंबिका मातेची मूर्ती बदलण्यास न्यायालयाचा नकार

### देवी भोयरे येथील अंबिका मातेची मूर्ती बदलण्यास पुणे धर्मादाय आयुक्तांची स्थगिती, तज्ज्ञ अहवालांतील मतभेद

नगर – पारनेर तालुक्यातील देवी भोयरे येथील श्री अंबिका मातेच्या पुरातन पंचधातूच्या मूर्तीबाबत सुरू असलेल्या वादावर पुणे विभागाच्या संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. श्री देवी भोयरे ट्रस्टच्या विश्वस्तांनी मूर्ती जीर्ण झाल्याचे कारण देत ती बदलण्याचा घेतलेला निर्णय संयुक्त धर्मादाय आयुक्तांनी तूर्तास स्थगित केला आहे. ही मूर्ती 'न्यास मालमत्ता' असून तिच्या स्थितीबाबत तज्ज्ञांचे परस्परविरोधी अहवाल सादर झाल्याने तसेच भाविक व ग्रामस्थांचा तीव्र विरोध असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

श्री देवी भोयरे ट्रस्ट ही महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांतर्गत नोंदणीकृत संस्था आहे. या मंदिरात १८ ऑगस्ट १९९२ रोजी अष्टभुजा स्वरूपातील पंचधातूची मूर्ती विधिवत प्रतिष्ठापित करण्यात आली होती. ग्रामस्थांच्या माहितीनुसार, गेल्या शंभर वर्षांहून अधिक काळ ही मूर्ती श्रद्धेचे केंद्र राहिली आहे. मात्र जानेवारी, फेब्रुवारी २०२५ दरम्यान सध्याच्या विश्वस्तांनी मूर्तीची पाहणी केली असता ती जीर्ण झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.



काही कारागिरांच्या सल्ल्यानुसार मूर्ती पाठीमागून पोकळ झाली असून भविष्यात धोका संभवतो, असे नमूद करत विश्वस्तांनी मूर्ती बदलण्याचा ठराव संमत केला. त्यानंतर नवीन मूर्ती तयार करण्यासाठी देणग्या गोळा करण्यासही सुरुवात करण्यात आली. मात्र या निर्णयाला देवी भोयरे गावातील ग्रामस्थ व भाविकांनी तीव्र विरोध दर्शविला.

ग्रामस्थांच्या मते, सध्याची मूर्ती पूर्णतः सुरक्षित असून पूजेसाठी योग्य आहे. त्यांनी स्वतः एका तज्ज्ञ कारागिराकडून मूर्तीची तांत्रिक तपासणी करून घेतली. त्या अहवालात मूर्तीला कोणताही तडा गेलेला नसून ती बदलण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ बाळासाहेब सखाराम मुळे, बटू नामदेव मुळे, अमृत शंकरलाल भंडारी यांच्यासह इतरांनी ट्रस्टचे विश्वस्त बाबुराव एकनाथ बेलोते, शिवाजी गोपाळ जाधव, संपतराव देवराम वाळुंज, भाऊसाहेब पोपट सारडे आदींविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या कलम ४९–ई अंतर्गत पुणे संयुक्त धर्मादाय आयुक्तांकडे धाव घेतली.

पुणे विभागाचे संयुक्त धर्मादाय आयुक्त–२ राहुल जी. मामू यांच्यासमोर या प्रकरणाची सविस्तर सुनावणी झाली. अर्जदारांच्या वतीने अ‍ॅड. जे. के. चौधरी यांनी बाजू मांडताना सांगितले की, विश्वस्तांनी ग्रामसभेचा ठराव झाल्याचा दावा केला होता; मात्र ग्रामपंचायतीने लेखी स्वरूपात असा कोणताही ठराव झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. मूर्ती बदलणे म्हणजे ट्रस्टच्या मालमत्तेचे नुकसान होय, असा युक्तिवादही त्यांनी मांडला.

अ‍ॅड.चौधरी यांनी सांगितले की, मूर्ती ट्रस्ट स्थापन होण्यापूर्वीची असली तरी ती ट्रस्टचीच मालमत्ता आहे. या प्रकरणात तज्ज्ञांचे अहवाल परस्परविरोधी असल्याने तिसऱ्या त्रयस्थ आणि निष्पक्ष तज्ज्ञामार्फत तपासणी होणे आवश्यक आहे. तोपर्यंत मूर्ती बदलणे योग्य ठरणार नाही.

विश्वस्तांच्या वतीने अ‍ॅड. जी. बी. गवई यांनी युक्तिवाद करत सांगितले की, मूर्ती बदलण्याचा निर्णय हा तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच घेण्यात आला असून तो ट्रस्ट व भाविकांच्या हितासाठी आहे.

दोन्ही बाजूंचा सखोल विचार केल्यानंतर संयुक्त धर्मादाय आयुक्त राहुल जी. मामू यांनी २३ जानेवारी २०२६ रोजी निकाल दिला. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, सदर मूर्ती ही ट्रस्टची 'न्यास मालमत्ता' आहे. तिच्या स्थितीबाबत दोन परस्परविरोधी तांत्रिक अहवाल उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत मूर्ती बदलल्यास मालमत्तेचे अपरिवर्तनीय नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, जोपर्यंत मूर्तीच्या स्थितीबाबत पूर्ण खात्री होत नाही किंवा न्यायालयाची स्पष्ट परवानगी मिळत नाही, तोपर्यंत मूर्ती हटवण्यास किंवा बदलण्यास विश्वस्तांना मनाई करण्यात येत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहेत. श्रद्धेशी निगडित विषयांमध्ये घाईघाईने निर्णय न घेता कायदेशीर प्रक्रिया आणि मालमत्तेचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले आहे. या निकालामुळे देवी भोयरे येथील ऐतिहासिक व श्रद्धास्थान असलेली अंबिका मातेची मूर्ती तूर्तास तरी मूळ ठिकाणीच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## जीवनात यशस्वी होण्यासाठी परिश्रम, प्रामाणिकपणा व सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक

### माणिकराव विधाते यांचे प्रतिपादन; सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण उत्साहात, दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

नगर – जीवनात यशस्वी होण्यासाठी परिश्रम, प्रामाणिकपणा व सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे प्राध्यापक माणिकराव विधाते यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात नमूद केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, नेतृत्वगुण व जबाबदारीचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक माणिकराव विधाते उपस्थित होते.



सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला.

अहिल्यानगर शहरातील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये शनिवारी उत्साहात विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण (Investiture Ceremony) तसेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला.

शाळेच्या प्राचार्या गीता तांबे, प्राथमिक मुख्याध्यापिका कंचन पापडेजा तसेच संस्थेच्या मान्यवरांनी पदग्रहण समारंभातील विद्यार्थी प्रतिनिधींना बॅज प्रदान करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर त्यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक मूल्यांचा जीवनात अंगीकार करण्याचा संदेश दिला. निरोप समारंभात विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत शाळेतील आठवणी, शिक्षकांचे मार्गदर्शन व मित्रमैत्रिणींच्या सहवासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान यांनी पदग्रहण केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीचें अभिनंदन केले व इ. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शिरीन शेख यांनी केले.

हा कार्यक्रम शिस्तबद्ध नियोजन, सांस्कृतिक सादरीकरण व विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे आनंदी व भावपूर्ण वातावरणात पार पडला.

## भंगार विक्रीच्या बहाण्याने व्यापाऱ्याला गोदामात नेऊन काठीने बेदम मारहाण

नगर – भंगार आणि पुठ्ठा खरेदीचा व्यवहार करण्याच्या बहाण्याने दोन अनोळखी इसमांनी एका व्यापाऱ्याला निर्जन स्थळी नेऊन बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना सारसनगर व्हिडीओकॉन कंपनीचे जुने गोडावून येथे १ फेब्रुवारीला दुपारी २ च्या सुमारास घडली.

याप्रकरणी रामनारायण दुर्गा निशाद (वय ४४, रा. वारुळाचा मारुती रोड) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. निशाद यांचे हरीओम मर्चंट नावाचे भंगार दुकान आहे. १ फेब्रुवारी रोजी दुपारी ते आयुर्वेद कॉर्नर जवळ भंगार माल गोळा करत असताना तेथे दोन अनोळखी व्यक्ती आले. त्यांनी आमच्याकडे भरपूर भंगार माल व पुठ्ठा असून तो विकायचा आहे. तुम्हांला हवा असेल तर आमच्या बरोबर चला असे म्हणाले. त्यामुळे फिर्यादी हे आरोपींच्या दुचाकीमागे त्यांची तीन चाकी मालवाहतूक रिक्षा घेवून गेले.

आरोपींनी निशाद यांना सारसनगर येथील व्हिडीओकॉन कंपनीच्या जुन्या गोदामात नेले. तेथे रिक्षा थांबवायला लावून गोदामात नेत माल दाखवला. त्यानंतर त्यांनी लगेच पैशांची मागणी केली. यावेळी निशाद यांनी आपल्याकडे पैसे नाहीत, मुलाला बोलावतो व मुलगा आल्यावर मालाचे जेवढे पैसे होतील ते देतो असे सांगितले. याचा राग आल्याने आरोपींनी त्यांना घाण घाण शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. त्यापैकी एकाने तेथे पडलेल्या लाकडी काठीने निशाद यांच्या मांडीवर जोरात प्रहार करून त्यांना जखमी केले. मुलाने आरोपींना फोन केला असता त्यांनाही धमकावण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास पुढील सुरू आहे.

## हस्ताक्षर स्पर्धेत विराज सासवडे प्रथम; धोत्रे खुर्द शाळेचे सलग चौथ्या वर्षी यश

नगर – पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धोत्रे खुर्द येथील इयत्ता चौथीतील विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याने अहिल्यानगर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून ऐतिहासिक यश संपादन केले आहे. या यशामुळे धोत्रे खुर्द शाळेची हस्ताक्षर स्पर्धेतील उज्ज्वल परंपरा सलग चौथ्या वर्षी कायम राहिली आहे.



हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम आलेला धोत्रे खुर्द शाळेचा विद्यार्थी विराज सासवडे.

अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सुंदर अक्षररचना, अक्षरांची सुस्पष्टता, शिस्तबद्ध मांडणी आणि लेखनातील सातत्य या सर्व निकषांवर विराजच्या हस्ताक्षराने परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आणि त्याला प्रथम क्रमांकाचा मान मिळाला.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्याने मिळवलेले हे यश अत्यंत प्रेरणादायी असून, योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही शिखर गाठता येते, हे विराजने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे.

विराज सासवडे याला वर्गशिक्षक सचिन ठाणगे व नंदा चेमटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

शाळेने सलग चौथ्या वर्षी जिल्हास्तरावर हस्ताक्षर स्पर्धेत यश संपादन केल्याबद्दल खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी विनेश लाळगे, विस्तार अधिकारी चांगदेव गवळी, केंद्रप्रमुख उत्तम फंड, शाळा व्य.स.अध्यक्ष बाळासाहेब नाईकवाडी, सरपंच बाबासाहेब सासवडे, सुभाष सासवडे तसेच ग्रामस्थांनी विराजचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लिनेस सर्विस ऑर्गनायझेशन ऑल इंडिया लिमिट क्लब्स मल्टिपल चतुर्भुज अंतर्गत 'डिस्ट्रिक्टचा पदग्रहण सोहळा'

नगर– लिनेस सर्विस ऑर्गनायझेशन ऑल इंडिया लिमिट क्लब्स मल्टिपल चतुर्भुज अंतर्गत डिस्ट्रिक्ट एम एच ३ गोदा तरंग चा पदग्रहण कृष्ण शोभा, अहिल्यानगर येथे झाला. या कार्यक्रमाचे अधिकारी पास्ट मल्टिपल प्रेसिडेंट डॉ. वर्षा झंवर यांनी स्वागत करुन सोहळ्याचे उद्घाटन केले व लिनेस संघटने बद्दल ची माहिती दिली.



पदग्रहण अधिकारी पास्ट मल्टिपल प्रेसिडेंट लिनेस अंजली विसपुते यांनी उत्कृष्टपणे नवरत्नांच्या संकल्पनेने सर्व लिनेस कॅबिनेट व नवीन पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. या पदग्रहण सोहळ्यासाठी २०२६ च्या नवनिर्वाचित मल्टिपल प्रेसिडेंट व प्रमुख अतिथी लिनेस अलका डोंगरे यांच्या हस्ते लिनेस निलम परदेशी यांना प्रांताध्यक्ष पदाची सूत्रे देण्यात आली.

याप्रसंगी लिनेस अलका डोंगरे यांनी लिनेसची जगातील व्याप्ती व लिनेस तर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. महिलांनी आपल्या रोजच्या व्यापातून समाजसेवेसाठी वेळ द्यावा. असेही सुचवले.

नवनिर्वाचित प्रांताध्यक्ष लिनेस निलम परदेशी यांनी यावर्षीची थीम सेवा से स्वयं तेजस्वी भव: घोषित केली. यावर्षी पाणी वाचवा, मुली वाचवा, महिला सक्षमीकरण, बाल व महिला विकास, निसर्ग संवर्धन व शैक्षणिक या मुख्य उद्दिष्टांवर काम करून समाजातील सर्व घटकांचा स्वयं विकासावर भर देणार आहे.

डिस्ट्रिक्ट पीन व डिस्ट्रिक्ट डिरेक्टरी सफायरचे सर्वांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

प्रथमच दोन डिस्ट्रिक्ट उपक्रम राबविण्यात येणार आहे यामध्ये सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व दहावीच्या मुलांसाठी शैक्षणिक सॉफ्टवेअर अल्पदरामध्ये उपलब्ध करणार आहे.

यावेळी सचिव पदी – लिनेस शर्मिला कदम, खजिनदार पदी – लिनेस शोभा भालसिंग, पीआरओ पदी – लिनेस लाजरी जोशी, संपादक पदी – लिनेस अजिता एडके यांची नियुक्ती झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

या पदग्रहण सोहळ्यात अहिल्यानगर, संगमनेर, श्रीरामपूर, शिर्डी, कोपरगाव, राहता, नाशिक, पुणे येथील लिनेस उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची प्रस्तावना लिनेस छाया रजपुत यांनी केली. पूर्व प्रांताध्यक्ष्य लिनेस लतिका पवार व उपाध्यक्ष लिनेस वर्षा गावते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

पदग्रहणाचे सूत्रसंचालन लिनेस लाजरी जोशी यांनी केले. सचिव लिनेस शर्मिला कदम यांनी आभार मानले.

## स्टॅमीना स्पोर्टस् अ‍ॅकॅडमीचा खेळाडू अबुबकर हमजा चुडिवाला याचे यश

नगर – नुकत्याच वाडियापार्क येथे झालेल्या बॉक्सिग स्पर्धेमध्ये स्टॅमिना स्पोर्टस् अकॅडमीचा अबुबकर हमजा चुडिवाला हा विद्यार्थी सिल्व्हर मेडल विजेता ठरला आहे. तो इयत्ता पाचवीचा विद्यार्थी असून इंग्लिश मीडियम शाळेत शिकतो. तो स्टॅमिना स्पोर्टस् अ‍ॅकॅडमीचा हातमपुरा शाखेचा खेळाडू असून तो नेहमी न चुकता सराव करतो. सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.



अ‍ॅकॅडमीचे संचालक शेख वसीम म्हणाले, तरुण पिढी व्यसनमुक्त व्हावी व मोबाईलच्या वाईट परिणामापासून दूर व्हावे व शरीर तंदुरुस्तीसाठी अक्‍डमी जॉईन करावी शरीर तंदुरुस्त तर मन तंदुरुस्त आजपर्यंत स्टॅमिना स्पोर्ट्स अकॅडमीने अनेक खेळाडू तयार केले. तरी सर्वांनी हातमपुरा, गुलमोहर रोड शाखेचा लाभ घ्यावा असे आवाहन आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते वसीम हाजी इसहाक यांनी केले. संपर्क ८३२९१९१८५९/९८५०३२७८६५ वर संपर्क साधावा.

## स्नेहबंध फौंडेशनच्यावतीने शिवजयंतीनिमित्त जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा–२०२६ चे आयोजन

नगर – लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे, अशी माहिती स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी दिली.



ही स्पर्धा इयत्ता ६ वी ते ९ वीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणार आहे

१) छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि आजची पिढी, २) माझे आराध्य : छत्रपती शिवाजी महाराज, ३) शिवाजी महाराज आज असते तर

असे निबंध स्पर्धेसाठी विषय आहेत. या स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके देण्यात येतील. विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक देण्यात येईल.

स्पर्धकांनी निबंध १० फेब्रुवारी पर्यंत पियूष फोटो स्टुडिओ, १०६३, शिवाजी चौक, भिंगार, अहिल्यानगर – ४१४००२ या पत्त्यावर स्वतः किंवा पोस्टाने / कुरिअर ने पाठवायचे आहेत. अधिक माहिती साठी ८७९३ १९१९१९ या क्रमांकावर संपर्क साधावा. मागील विजेते स्पर्धकांना सहभाग घेता येणार नाही.

विद्यार्थांनी निबंध शाळेत लिहून त्यावर वर्गशिक्षकांची स्वाक्षरी घ्यावी. स्पर्धेत प्रवेश मोफत आहे.

## गुडघा, खुबा उपचारांसाठी संचेती हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर आता अहिल्यानगरमध्ये उपलब्ध

नगर – गुडघा, खुबा आणि हाडांच्या उपचारासाठी पुणे येथील संचेती हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉ. साहील संघवी यांचे मार्गदर्शन व उपचार आता अहिल्यानगर शहरात उपलब्ध झाले आहेत. प्रोफेसर कॉलनी येथील रेणुकामाता मंदिराजवळ डॉ.कुऱ्हाडे क्लिनिक येथे ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १ यावेळेत डॉ.संघवी रूग्ण तपासणी करणार आहेत.



डॉ. साहील संघवी

वेदनांनी ठणकणाऱ्या गुडघ्याला व खुब्याला शांत करण्याची संधी प्रभावी उपचारांनी मिळणार आहे. गुडघ्यात सूज येणे, तणाव किंवा कडकपणा, गुडघ्याची हालचाल करताना कटकट आवाज येणे, चालताना किंवा उठबस करताना अडचण येणे, ऑस्टियोआर्थरायटिस, गुडघ्यातील काही लीगमेंटस, टेंडन्समध्ये जखम याशिवाय खुब्याच्या आसपास किंवा मणक्याच्या खाली वेदना जाणवणे, पोटात ताण किंवा कडकपणा जाणवणे, खुब्याच्या क्षेत्रात सूज येणे, चालताना किंवा बसताना खुब्यामध्ये वेदना होणे, अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी सदर तपासणीचा लाभ घ्यावा. संचेती हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टर दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी डॉ.कुऱ्हाडे क्लिनिक येथे उपलब्ध असतील. अधिक माहितीसाठी संपर्क : ८८८८८९३९५०/७७७४०२४१२९.

## तरुणीचा पाठलाग करून विनयभंग, कुटुंबियांना मारहाण; बोल्हेगावात परिसरातील घटना, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर– शहरातील बोल्हेगाव परिसरात एका तरुणीचा पाठलाग करून अश्लील हातवारे करणाऱ्या आणि तिला घराबाहेर ओढून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिघांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी पीडित तरुणीच्या आई–वडिलांनी आणि भावाने विचारणा केली असता, आरोपींनी त्यांनाही बेदम मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, संशयित आरोपी ऋषीकेश नागथाई हा पीडित तरुणी घराबाहेरून येता–जाता नेहमी अश्लील नजरेने पाहून शिट्ट्या वाजवत असे. या वर्तनाबाबत त्याला वारंवार समज देऊनही त्याच्यात काहीच बदल झाला नाही. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी तरुणी घरात एकटी असताना ऋषीकेश त्याच्या दोन मित्रांसह (प्रसाद भंडारी आणि अमोल कचरे) तिच्या घरासमोर आला. यावेळी तिन्ही आरोपींनी आरडाओरडा करून तरुणीला उद्देशून अत्यंत अश्लील भाषेचा वापर केला. तरुणी घराच्या गच्चीवर कपडे काढण्यासाठी जात असताना आरोपींनी जबरदस्तीने घराच्या कंपाऊंडमध्ये प्रवेश केला. ऋषीकेश आणि प्रसाद यांनी तरुणीचा हात धरून तिला घराबाहेर ओढून नेण्याचा प्रयत्न केला. तरुणीने आरडाओरडा केल्यावर तिचे आई–वडील आणि भाऊ धावून आले. त्यांनी तरुणीची सुटका केली असता, तिन्ही आरोपींनी या कुटुंबाला शिवीगाळ करत मारहाण केली. लोक जमू लागल्याने आरोपींनी 'पोलिसांत तक्रार केली तर सोडणार नाही' अशी धमकी देऊन तेथून पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

